अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार दि. २४ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ८८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# फडणवीस खोटी माहिती देण्यात दंग, नाना सोमवारी दाखल करणार हक्कभंग

✔ सुराज्य/सोलापूर

**बंडाच्या मार्गाने सत्तेवर आलेले 'ईडी सरकार' सत्ता वाचवण्यासाठी वाट्टेल त्या मार्गाचा अवलंब करत आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करत आहेत. उपमुख्यमंत्री तर विधिमंडळात खोटी माहिती देण्यात दंग आहेत. त्यामुळे आता त्यांच्यावर सोमवारी हक्कभंग प्रस्ताव दाखल करणार आहोत, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.**



तिकडे लोकसभेत शिवसेनेच्या शिंदे गटाचे खा. राहुल शेवाळे यांनी दिशा सालियन मृत्यू प्रकरण उपस्थित करताच त्याचे पडसाद इकडे राज्याच्या विधिमंडळात पडले. त्यावरूनच विधानसभेत गदारोळ माजला आहे. या प्रकरणाचा सीबीआयने तपास केलाच नव्हता, असे सांगून गृहमंत्री अर्थात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी एसआयटी चौकशीचे निर्देश दिले आहेत. मात्र दिशा सालियन मृत्युप्रकरणाचा तपास सीबीआयनेच केला असून त्या तपासाचा अहवाल आमच्याकडे आहे. फडणवीस खोटी माहिती सांगून विधानसभेचा अवमान करत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता हक्कभंग प्रस्ताव दाखल करणार असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले.

## काय म्हणाले नाना पटोले? फडणवीसांकडून पदाचा दुरुपयोग

नागपूरमधील एनआयटी घोटाळ्याबाबत विरोधात असताना फडणवीस यांनीच न्यायालयात याचिका दाखल केली होती. आता सत्ता येताच त्यांनी ही याचिका मागे घेतली. याचाच अर्थ एकनाथ शिंदे यांनी हा घोटाळा केल्याचे, हे सिद्ध होत आहे. तसेच रश्मी शुक्ला यांच्या फोन टॅपिंग प्रकरणातही फडणवीस यांनी गृहमंत्री झाल्यानंतर गुन्हा रद्द करण्याचा प्रयत्न केला. क्लोजर रिपोर्ट न्यायालयात पाठवला. हे दोन्ही मुद्दे पाहता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचे सिद्ध होते आहे, असे विरोधकांचे म्हणणे आहे.

## राणे यांनी केली होती तक्रार

सीबीआयने दिशा सालियन आणि सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूचा तपास केला आहे. याबाबतची तक्रार भाजपनेते केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केली होती. या तपासाचा अहवाल आमच्याकडे आहे. मात्र, फडणवीस म्हणतात की दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयने केला नाही. सभागृहाला खोटी माहिती देणे हा सभागृहाचा अवमान आहे. त्यामुळे आम्ही सोमवारी देवेंद्र फडणवीस यांच्यावर हक्कभंग आणणार, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली.



## फडणवीस म्हणतात...

मुळात दिशा सालियन प्रकरण कधीच सीबीआयकडे गेले नाही. सुशांतसिंह राजपूत प्रकरण सीबीआयकडे गेले आहे. सीबीआयला दिशा सालियन प्रकरणाबद्दल विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की ही केस आमच्याकडे नाही. आम्ही चौकशी केलेली नाही. त्यामुळे त्यासंदर्भात सीबीआयचा कोणताही क्लोजर रिपोर्ट नाही. सीबीआयकडे सुशांतसिंह राजपूत प्रकरण आहे. त्यासंदर्भात त्यांनी फॉरेन्सिकचे रिपोर्ट दाखवले आहेत. आता सालियन प्रकरणात नवीन पुरावे काही असतील तर त्यासंदर्भात चौकशी होईल.

**- देवेंद्र फडणवीस (गृहमंत्री व उपमुख्यमंत्री)**

# न्यायाधीश, दंडाधिकारी हेही कायद्यापेक्षा मोठे नाहीत

## केरळ कोर्टाने बजावले, हा सर्वांसाठी धडा समजा...

✔ सुराज्य/केरळ

कायद्यापेक्षा कुणीही मोठा नाही,असा सिद्धांत आपल्या घटनेचा असल्याचा उल्लेख विधी क्षेत्रातील मान्यवर नेहमीच करत असतात.या सिद्धांताला अनुरूप असाच एक महत्वपूर्ण निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे.न्यायाधीश, दंडाधिकरी व न्यायपालिकेतील अधिकारी हे कायद्याच्यावर नाहीत. त्यांनी कर्तव्यात कसूर केला तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे निरीक्षण या न्यायालयाकडून शुक्रवारी नोंदवले गेले. लक्षद्विपचे माजी मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या निलंबनाचेही आदेश न्यायालयाने दिले.

न्या. पी.व्ही कुन्हीकृष्णन् म्हणाले की, हे आदेश म्हणजे सर्वांसाठीच धडा आहे. जिल्हा लिगल सर्व्हीस प्राधिकरणाचे सचिव के. चिरायाकोया यांनी मुख्य न्यायदंडाधिकारी असताना कर्तव्यात कसूर केला. एका साक्षीदाराच्या पुराव्यात त्यांनी फेरफार केली. त्यांची ही चूक गंभीर आहे. के. चिरायाकोया यांना निलंबित करावे. त्यांची सविस्तर चौकशी करावी. त्यांच्यावर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई करावी, असे आदेश न्यायालयाने लक्ष्यद्विप प्रशासनाला दिले आहेत. चिरायाकोया यांच्यासह लिपिक पी. पी. मुथुकोया व कनिष्ठ लिपिक ए.सी. पुथीनी यांचीही प्राथमिक चौकशी करावी, असे उच्च न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. माजी मुख्य न्यायदंडाधिकारी चिरायाकोया, लिपिक मुथुकोया, कनिष्ठ लिपिक पुथीनी यांनी २३ जानेवारी २०२३ रोजी न्यायालयात हजर रहावे, असे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत.

शिक्षा झालेल्या एका आरोपीने केरळ उच्च न्यायालयात याचिका केली. माजी मुख्य न्यायदंडाधिकारी चिरायाकोया यांनी मनात द्वेष ठेवून मला शिक्षा ठोठावली. अवैधपणे गर्दी जमवणे, दंगल करणे, सरकारी कर्मचाऱ्याला कर्तव्य करण्यापासून रोखणे, असा माझ्यावर आरोप होता. तपास अधिकाऱ्याने याचे पुरावे सादर केले. मात्र या पुराव्यात मुख्य दंडाधिकारी चिरायाकोया यांनी फेरफार केली व मला साडेचार वर्षांची शिक्षा ठोठावली, असा दावा आरोपीने याचिकेत केला. आरोपीचा हा दावा खरा ठरवणारे प्रतिज्ञापत्र तपास अधिकाऱ्याने उच्च न्यायालयात सादर केले. मी कोणताही पुरावा न्यायालयात सादरच केला नाही, असा खुलासा तपास अधिकाऱ्याने प्रतित्रापत्रात केला. त्याची नोंद करुन घेत न्यायालयाने माजी मुख्य दंडाधिकारी चिरायाकोया यांच्या निलंबनाचे आदेश दिले.

**शक्तीशाली पेन...**

न्यायालय म्हणाले, न्यायाधीशाच्या हातातले पेन हे शक्तिशाली असते. त्याचा चांगल्या कारणासाठीच वापर व्हायला हवा. पेनाचा वापर करत असताना न्यायाधीशाच्या मनात भय किंवा कोणाला झुकते माप देण्याचा मानस नसावा, असेही न्यायालयाने यावेळी नमूद केले.

# सोनसाखळी चोरांवर पोलीस आयुक्तांनी केली मोक्का अंतर्गत कारवाई

✔ सुराज्य/सोलापूर

संघटितपणे इतर साथीदारांच्या मार्फत बळांचा वापर करून स्वतःच्या फायद्या करता महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेऊन जबरी चोरी करणाऱ्यांच्या विरोधात पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी क्शन घेत संघटित गुन्हेगाराला आळा घालण्याकरिता आकाश सिध्दलिंग जाधव (वय-२४, रा.सेटलमेंट, सध्या रा. जहाँगिर नगर, मुंढवा पुणे) व विजय जगन्नाथ पोसा (वय-२३, रा.सेंटलमेट, लिमयेवाडी सोलापूर, सध्या रा.गवळी आळी मुंडवा चौक, मुंढवा पुणे) या दोन साखळी चोराच्या विरोधात मोका अंतर्गत कारवाई केली.






सोलापूर शहरात मागील काही दिवसामध्ये विशेषतः विजापूर नाका पो.स्टे हददीत पायी चालत जाणाऱ्या महिलांना लक्ष करून,त्यांचे गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेण्याचे प्रकार जुळे सोलापूरतील कुमठेकर हॉस्पिटल समोर तसेच आरटीओ समोरील रस्त्यावर सप्टेंबर व ऑक्टोबर २०२२ मध्ये घडली होती.व विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हे दाखल झाले होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध घेऊन आकाश सिध्दलिंग जाधव व विजय जगन्नाथ पोसा यांना ताब्यात घेवुन अटक केली होती. तपासा दरम्यान त्यांनी गुन्ह्यात वापरलेली दुचाकी मोटार सायकल व मोबाईल फोन असा एकूण २ लाख ३०, हजार रुपये किंमतीचा ऐवज जप्त करण्यात आला होता. या दोन्ही आरोपी विरोधात चंदन नगर पुणे पोलीस ठाणे हद्दीत तीन जबरी चोरी केल्याचे गुन्हे नोंद झाले होते. या तिन्ही गुन्ह्यांची अधिक माहिती पोलीस उपायुक्त डॉ.दीपाली काळे,सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांनी घेतली. या आरोपींविरुद्ध मोका कायद्यांतर्गत प्रस्ताव तयार करून, पोलीस उपायुक्त,विजय कबाडे यांचे मार्फतीने पोलीस आयुक्त यांचेकडे सादर केला होता.

## ८० खेळाडू मालामाल, १० संघांनी खर्च केले १६७ कोटी

# सॅम करन १८.५० कोटींना सर्वात महागडा खेळाडू

✔ सुराज्य/मुंबई





तब्बल सहा तास चाललेल्या या लिलावात १० संघांनी १६७ कोटी रुपये खर्च केले. जगातील सर्वात प्रसिद्ध लीग अर्थात इंडियन प्रिमीयर लीग स्पर्धेच्या आगामी हंगामासाठी कोची येथील लिलावात रेकॉर्डब्रेक बोली लागल्याचं दिसून आलं.

इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करन याला तब्बल १८.५० कोटींना पंजाब किंग्सने विकत घेत रेकॉर्ड ब्रेक केला. याशिवाय कॅमरॉन ग्रीन आणि बेन स्टोक्स यांनाही तगडी किंमत मिळाली आहे. आहे. ग्रीनला १७.५० कोटींना मुंबई इंडियन्सने तर बेन स्टोक्सला १६.२५ कोटींना सीएसकेनं विकत घेतलं आहे. याआधी आयपीएलच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज अष्टपैलू ख्रिस मॉरिस सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. राजस्थान रॉयल्सने त्याला २०२१ मध्ये १६.२५ कोटींना खरेदी केले होते. पण यंदा त्याचा विक्रम मोडीत निघाला आहे. निकोलस पूरनलाही १६ कोटींना लखनौ सुपरजायंट्सने विकत घेतलं आहे.

# मुख्यमंत्री रविवारी करमाळ्यात

## आदिनाथ कारखाना गळीत हंगामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/सोलापूर




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवार २५ डिसेंबर रोजी सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. करमाळ्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखाना गळित हंगामाच शुभारंभ त्यांच्या हास्ते केला जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांचे सोलापूर विमानतळावर १.१५ वाजता आगमन होणार आहे. सोलापूर विमानतळावरून हॅलिकॉप्टरने १.३० वजाता प्रयाण होणार आहे. करमाळा तालुक्यातील शेदगाव भाळवणी येथिल हेलिपॅडवर १.३५ वाजता आगमन होणार आहे.

आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचा २७ वा ऊस गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती दुपारी ०२.३० वा. करमाळा येथून हेलिकॉप्टरने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण, दुपारी २.४५ वा. सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने नागपूरकडे प्रयाण होणार आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण अजुन किती अपग्रेड व्हायचं?

**कल्याण**
**379-98-134**

**मेन बाजार**
**127-01-588**

# इंद्रभुवन इमारत नूतनीकरणाचे काम महिनाअखेर पूर्ण होणार

## • इमारतीवर कायमस्वरूपी तिरंगा विद्युत रोषणाई

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूरच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या महापालिका आवारातील इंद्रभुवन इमारतीच्या नूतनीकरणाचे काम या महिना अखेर पूर्ण होणार आहे. या इमारतीवर तिरंगा विद्युत रोषणाई कायमस्वरूपी करण्यात आली आहे. प्रमुख अधिकाऱ्यांचे कार्यालयही या इमारतीत जाणार आहेत. मुंबईनंतर सोलापुरात हेरिटेज वास्तूमध्ये महापालिका आयुक्तांचे कार्यालय असणार आहे.**

११० वर्षांच्या इंद्रभुवन या हेरिटेज वास्तूला जतन करण्यासाठी स्मार्ट सिटीच्या सुमारे ५ कोटींच्या निधीतून इमारतीचे नूतनीकरण करण्यात येत आहे. साधारणतः गेल्या दहा महिन्यांपासून हे काम नेटक्या पद्धतीने सुरू आहे. सनरक्षण हेरिटेज कन्सल्टंट कंपनीमार्फत कंजर्वेशन आर्किटेक्चर मुनिश पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सुमारे दीडशे कारागीर यासाठी परिश्रम घेत आहेत.

हे नूतनीकरणाचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. येत्या महिना अखेरपर्यंत सर्वच काम पूर्ण होईल तशा सूचना महापालिकेच्यावतीने संबंधित कंपनीला दिल्या आहेत. इमारतीवर कायमस्वरूपी तिरंगा विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. सध्या याचे ट्रायल घेण्याचे काम सुरू आहे. सोलापुरातील इंद्रभुवन ही वास्तू हेरिटेज वास्तू आहे. ११० वर्षांपूर्वी आकर्षक अशी ही इमारत उभारण्यात आली होती. आता नूतनीकरणामुळे अत्यंत मनोहारी आणि विलोभनीय असे इमारतीचे दर्शन सर्वांना घडणार आहे.



### प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये जाणार इंद्रभुवनात

काम झाल्यानंतर साधारणता: २६ जानेवारी पर्यंत महापालिकेच्या प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये या इंद्रभुवन इमारतीत पुन्हा स्थलांतरित करण्यात येतील. या इंद्रभवन इमारतीत महापालिका आयुक्त, २ अतिरिक्त आयुक्त, दोन उपायुक्त, चार सहाय्यक आयुक्त यांची कार्यालय राहणार आहेत तर खाली कलादालन असणार आहे. यामध्ये ऐतिहासिक वस्तू संग्रहालय राहणार आहे. इंद्रभुवनसमोर सध्या असलेला आप्पासाहेब वारद यांचा पुतळा आहे. त्याच ठिकाणी जैसे थे राहणार आहे.

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटनाचे नियोजन

२६ जानेवारी रोजी या इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्याचे नियोजन महापालिकेकडून होत आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली.

# तोल का सुटला?

राज्य विधिमंडळातील शाब्दिक राडा सारा महाराष्ट्र पहात आहे. एकमेकांना कोणती भाषा वापरली जात आहे तसेच अजेंड्याचा विचार न करता राजकीय विषय आणून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप कशाप्रकारे केले जात आहेत हेही राज्याच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक मराठी माणूस वाचत आहे आणि ऐकतही आहे.अशा गोंधळी आणि चिरक्या लोकप्रतिनिधींपुढे अख्खा महाराष्ट्र हतबल झालेला असणार. जनताजनार्दन तरी करणार काय?आपणच निवडून दिलेले हे लोक आहेत. तेव्हा मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची? अशी या राज्याची खंत आहे. गुरूवारी विधानसभेत खालच्या पातळीवरच्या भाषेचा कहरच झाला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याबद्दल अपशब्द वापरला गेला. दिशा सॅलियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीची घोषणा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्यानंतर आपल्यालाही बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. मात्र शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांना बोलू देण्यास अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी परवानगी नाकारली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य अध्यक्षांच्या आसनासमोर धावले. त्यांनी आम्हांलाही बोलू द्या, अशी मागणी केली. परंतु, अध्यक्षांनी कामकाज पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. त्यावर आक्षेप घेताना संतप्त झालेल्या जयंत पाटील यांनी विरोधकांना तुम्ही बोलू देत नाही, असे सांगत तुम्ही असला निर्लज्जपणा करू नका, असे अध्यक्षांना सुनावले. त्यामुळे पाटील यांच्या निलंबनासाठी सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी दीड तास कामकाज रोखून धरले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही प्रचंड संतापले. त्यांनी जयंत पाटील यांना आत्ताच्या आता निलंबित करा, अशी मागणी केली. त्यावेळी उडालेल्या गदारोळात सभागृहाचे कामकाज पुन्हा तीन वेळा दीड तासांसाठी तहकूब करण्यात आले. जयंतराव एवढ्यावरच थांबले नाहीत तर ते पुढे



काय म्हणाले, आपल्याला निलंबित केले तरी राज्यातील तरुणांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, महिलांच्या प्रश्नांसाठी लढतच राहणार. सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत असल्याचा आरोप केला. दिशाभूल करणारे विषय सभागृहात उपस्थित करून सभागृहाचा मौल्यवान वेळ सत्ताधारी पक्षातील आमदार वाया घालवत होते. विरोधकांना बोलण्याची संधीच दिली जात नव्हती, तसेच मुख्यमंत्र्यांनी केलेले बेकायदेशीर भूखंड वाटप व गैरव्यवहाराबद्दल आम्ही उपस्थित करत असलेली चर्चा टाळण्याचा सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न होत होता. म्हणूनच असा निर्लज्जपणा करू नका, असे शिंदे-फडणवीस सरकारला उद्देशून म्हणालो,अशा शब्दात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी घेतलेला हा रोल कुणाला पटेल काय? सरकारच्या भूमिकेवर सडकून टीका करण्याचा विरोधकांना जरूर अधिकार आहे पण सभागृहात सभापतींचा मान ठेवण्याची गरज असते. ही शिस्त जयंतराव यांच्यासारख्या सिनिअर व अभ्यासू नेत्यांना सांगायची वेळ यावी ही राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी विरोधकांकडे आक्रमकपणा जरूर असावा पण भाषाही तितकीच लोकशाहीला अभिप्रेत असणारी हवी. भाषा उग्र वापरली म्हणजे त्यांनाच खरे विरोधक म्हणायचे काय? ही चुकीची बाब आहे. सभापतींना उद्देशून निर्लज्जपणा हा शब्द वापरायलाच नको होता. सभापतींची भूमिका निपक्ष नाही, असे विरोधकांना जेव्हा वाटते तेव्हा लोकशाहीच्या चाकोरीतून आंदोलन करता येते. हा मार्ग जयंतरावांनी का स्वीकारला नाही. त्यांचा असा तोल का सुटावा? माणसाकडून चूक होत असते. तिथेच ती लक्षात आल्यानंतर जयंतरावांनी माफी मागितली असती तर वाद मिटला असता. कारवाई टळली असती.पण जयंतरावांनी आपली भूमिका किती योग्य आहे हे ठासवण्याचा प्रयत्न केला. ही न पटणारी बाब ठरेल. पाटील यांच्याकडून अनावधानाने हा शब्द गेल्याचे सांगत झाल्या प्रकाराबद्दल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिलगिरी व्यक्त केली. पाटील हे सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांच्याकडून सहसा असा शब्दप्रयोग होत नाही. अध्यक्षांबद्दल आमच्या मनात आदरच आहे, अशा शब्दात पवारांनी मनाचा मोठेपणा व्यक्त केला हे एका दृष्टीने चांगलेच झाले. पवारांची ही दिलगिरी म्हणजे जयंतराव चुकलेच हे मान्य करावेच लागेल. हा खेद व्यक्त करताना पवारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा सत्ताधारी पक्षानेही विचार करायला हवा. वारंवार विनंती करूनही बोलायची परवानगी दिली जात नसेल तर सत्ताधारी पक्षाची ही भूमिका हुकूमशाहीचीच ठरते. तेव्हा सभापतींनी देखील याचा विचार केला पाहिजे. साऱ्यांनी राज्याचे हित पहावे, हीच अपेक्षा.

---


**राष्ट्रीय ग्राहक दिनविशेष**

# ग्राहकांची वाढती आर्थिक फसवणूक आणि सुरक्षा उपाय

सर्च इंजिनवरून कोणत्याही प्रकारचे उत्पादन किंवा वस्तू शोधल्यावर, खऱ्या ई-कॉमर्स कंपनीसह अनेक बनावट ई-कॉमर्स वेबसाइट्सची यादी आपल्यासमोर स्क्रीनवर उघडते, जी अत्यंत कमी दरात वस्तूंची किंमत दर्शवते. अशा बनावट वेबसाइट कंपनीचे नाव देखील कधी ऐकले नसते, २५००-३००० रुपयाची ब्रँडेड वस्तू ९९ किंवा १५९ सारख्या कमी किमतीत दाखवितात. त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी एक बंद मोबाइल नंबर आणि बनावट ईमेल आयडी दर्शविली जाते, त्यांच्या दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत कंपनी किंवा कार्यालय देखील नसते. अशा फसवणुकीच्या वेबसाईट्सचे जाळे अंदाधुंदपणे जगभर पसरवून ग्राहकांची मोठी लूट केली जाते. सोशल मीडिया, नेटवर्किंग साइट्सवर अनेक वेळा अशा बनावट लिंक्स दाखवल्या जातात, आपण कोणत्याही मोहात न पड़ता नेहमी अस्सल ई-कॉमर्स कंपनीकडूनच खरेदी करावी. कोणत्याही गोष्टीचा विचार न करता लोभापोटी फेक ऑफरला बळी पडून लोकं आपली विवेकबुद्धी न वापरता खोट्या गोष्टींना सत्य मानून पैसे गमावतात आणि त्यांच्या ओळखीच्या लोकांमध्ये सुध्दा त्या बनावट लिंक्स किंवा बनावट ऑफर शेअर करतात. आजकाल आपल्याला असे खोटे कॉल, मेसेज, ईमेल येत राहतात, कोणावरही लगेच विश्वास ठेवणे महागात पडू शकते. काळजी व सावधगिरी न घेतल्याचे नुकसान आपल्याला भोगावे लागते. आपण कोणतीही वस्तू विकत घेताना, त्या वस्तूशी संबंधित संपूर्ण माहिती घ्यायला हवी, उदाहरणार्थ, त्या वस्तूची कमाल किंमत, त्याचे वजन, सामग्रीची गुणवत्ता आणि प्रमाण, पॅकिंगची तारीख, शेवटची तारीख, संपर्क तपशील, मान्यताप्राप्त संस्थेचे नाव आणि इतर माहिती देखील काळजीपूर्वक बघावी. वस्तूवर दर्शविलेल्या कमाल किमतीपेक्षा जास्त पैसे ग्राहकाकडून घेणे कायद्याने गुन्हा आहे. ग्राहकाने दुकानदाराला खरेदी केलेल्या वस्तूचे पक्के बिल विचारावे, पूर्ण समाधान झाल्यावरच वस्तू खरेदी करावी.

गेल्या तीन वर्षांत देशात १६ लाखांहून अधिक सायबर गुन्ह्यांच्या घटना घडल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत दिली.

गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सायबर फसवणुकीच्या अहवालांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०२२ च्या पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीत सायबर फसवणुकीच्या तक्रारींमध्ये १५.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे, नंतर ते ३४ टक्क्यांपर्यंत वाढले. आरबीआयच्या मते, सप्टेंबर २०२२ ला संपलेल्या आर्थिक वर्षात यूपीआय पेमेंटमध्ये १२०० टक्के वाढ झाली आहे. एक्सपेरियनच्या ग्लोबल आयडेंटिटी अँड फ्रॉड रिपोर्ट २०२२ च्या सर्वेक्षणानुसार, जवळपास एक तृतीयांश भारतीय ग्राहक ऑनलाइन फसवणुकीला बळी पडले आहेत. प्रामुख्याने सोशल मीडिया साइट्स (३८%), पेमेंट सिस्टम प्रदाते (३०%) आणि ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्म (३०%) वर फसवणूक



अनुभवली. ओपसेक सिक्युरिटीच्या संशोधनानुसार, २०२० मध्ये ८६% ग्राहक ओळख चोरी, क्रेडिट/डेबिट कार्ड फसवणूक किंवा डेटा उल्लंघनाचे बळी होते, २०१९ च्या तुलनेत ८०% पेक्षा जास्त वाढ झाली आहे.

फेडरल ट्रेड कमिशनने अहवाल दिला की यूएस ग्राहकांनी गेल्या वर्षी २०२१ मध्ये फसवणुकीमुळे ५.८ अब्ज डॉलर गमावले, २०२० च्या तुलनेत ७०% पेक्षा जास्त. मायक्रोसॉफ्ट २०२१ ग्लोबल टेक सपोर्ट स्कॅम रिसर्च रिपोर्टनुसार, भारतातील ग्राहकांनी २०२१ मध्ये ६९% वर ऑनलाइन फसवणुकीचा उच्च दर अनुभवला. लोकल सर्कल्स या खाजगी कंपनीने सर्वेक्षणात उघड केले आहे की ४२% भारतीयांनी गेल्या ३ वर्षात आर्थिक फसवणुकीचा अनुभव घेतला आणि त्यापैकी ७४% पैसे परत मिळवण्यात अयशस्वी झाले. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, बँकांच्या फसवणुकीमुळे गेल्या ७ वर्षांत भारताला दररोज किमान १०० कोटींचे नुकसान झाले आहे.

ग्राहकाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी व योग्य न्याय मिळावा यासाठी त्यांना काही अधिकार देण्यात आले आहेत जसे की :- सुरक्षिततेचा अधिकार, माहिती मिळण्याचा अधिकार, निवडीचा अधिकार, ऐकण्याचा अधिकार, तक्रार निवारणाचा अधिकार, ग्राहक शिक्षणाचा अधिकार. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, ग्राहकाला कुठूनही तक्रार नोंदवण्याचा अधिकार, उत्पादनाच्या दायित्वांतर्गत नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार आणि त्याची तक्रार का नाकारली गेली हे जाणून घेण्याचा अधिकार आहे.

ग्राहक संरक्षण कायदा हा ग्राहक, उत्पादन उत्पादक, उत्पादन विक्रेता, उत्पादन सेवा प्रदाता, व्यापारी, जाहिरात संस्था, समर्थनकर्ता आणि ई-कॉमर्स विक्रेता यांना लागू होतो. ग्राहक संरक्षणासाठी अनेक कायदे केले गेले आहेत जसे :- ग्राहक संरक्षण कायदा १९८६, भारतीय करार कायदा १९७२, वस्तूंची विक्री कायदा १९३०, अन्न भेसळ प्रतिबंध कायदा १९५४, ट्रेड मार्क कायदा १९९९ आणि इतर. तुम्ही ग्राहक तक्रार १८००-११-४००० किंवा १९१५ (टोल फ्री) वर कॉल करू शकता किंवा तुमची तक्रार नोंदवण्यासाठी ८८०००१९१५ वर एसएमएस करू शकता, ऑनलाइन तक्रार सुध्दा नोंदवू शकता. केवळ सायबर आर्थिक फसवणुकीशी संबंधित तक्रारींसाठी १९३० डायल करावे. तुमची वैयक्तिक माहिती सर्वत्र शेअर करू नका, बँकिंग खात्याची माहिती देणे नेहमी टाळा, आरबीआयने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करा, नेहमी सतर्क राहा, तुमचे अधिकार समजून घ्या आणि जागरूक ग्राहक बना.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**

---

**टुडेज ब्लॉग**

**'कर्नाटकखेरीज इतर सीमांचे प्रतिबिंब विधीमंडळाच्या नागपूर अधिवेशनात नाही. राज्याची साठी उलटल्यानंतरही भामरागड महाराष्ट्रात आहे याची जाणीव किती जणांना आहे, असे जनसंघर्ष समितीने विचारले आहे. आम्हीही तेलंगण, छत्तीसगडच्या सीमेवर राहतो' या उद्गारांमागील त्यांचा विषाद समजून घ्यायला हवा.**

# आम्ही सीमावासीय, पण...

केंद्रीय गृहमंत्र्यांनी लक्ष घातल्यावरही सीमांचे दुखणे थांबलेले नाही. कर्नाटकसोबतच गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगण, गोवा ही सहा राज्ये आणि दादरा-नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशाशी आपली हद्द जुळली आहे. वैदर्भीय सीमा भागातील हाक कायम दुर्लक्षित आहे. ठणक न जाणवणाऱ्या दुखण्यांचे दुर्लक्ष घातक ठरते. निमूटपणे जाच सोसणाऱ्या भूभागांचे विस्मरण झाले तर डिवचण्याचा 'बोम्मई पॅटर्न' आम्हीही स्वीकारू, असा सूर विदर्भाच्या कोपऱ्यांतून येऊ घातला आहे.

महाराष्ट्रातील ३६ पैकी २० जिल्ह्यांचा सीमावर्ती राज्यांशी दैनंदिन संपर्क येतो. विदर्भाचा विचार केला तर अमरावती, नागपूर, भंडारा आणि बुलडाणा जिल्ह्यांच्या कक्षा मध्य प्रदेशसोबत जुळल्या आहेत. गोंदिया जिल्ह्याला मध्यप्रदेश आणि छत्तीसगडची सीमासोबत आहे. गडचिरोलीचा छत्तीसगड आणि तेलंगण राज्यांशी तिन्हीत्रिकाळ संबंध येतो. यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्हेही तेलंगणला लागून आहेत. यवतमाळच्या सीमेजवळील पाटणबोरी, पिंपळखुटी, अर्ली चनाखा गावांतील नागरिकांना अदिलाबादची बाजारपेठ जवळची वाटते.

अनेकांची शेती दोन्ही राज्यांत आहे. तिथे मराठीसह तेलुगूही बोलली जाते. सुविधांच्या बाबतीत तेलंगणपेक्षा महाराष्ट्र मागे आहे. पांढरकवडा तालुक्यातील पिंपळखुटी हे राज्यातील शेवटचे गाव. नंदीग्राम एक्स्प्रेस बंद झाल्याने तेथील मुंबईचा संपर्क खुंटला. यवतमाळ जिल्ह्यात पैनगंगा नदीने तेलंगण आणि महाराष्ट्राला विभागले आहे. तिथे निम्न पैनगंगा धरण होणार आहे. त्याचा ८८ टक्के लाभ महाराष्ट्राला, तर १२ टक्के तेलंगणला मिळेल. महाराष्ट्राच्या दुर्लक्षामुळे २६ वर्षांपासून ते रखडले आहे. २०१६च्या करारानुसार पैनगंगा नदीवर चार बंधारे बांधायची होती. चनाखाजवळ तेलंगणचे काम झाले. आपले पैसेच आले नाहीत. तिकडे बंधाऱ्यातील पाणी उपसण्यासाठीचे पम्पहाउस झाले आणि शेतीसाठी कालवाही. आदिलाबादला सिंचनाचा लाभ मिळाला. तिकडच्यासारखी इकडे २४ तास नि:शुल्क वीज नाही. किसान सन्मान योजनेचे लाभ नाहीत. तेलंगणात जाणे बरे अशी आवई अध्येमध्ये उठते. ती कामातूनच थोपविता येईल. बुलढाणा जिल्ह्याच्या सातपुडा भागातील जळगाव-जामोद तालुका मध्यप्रदेशशी जुळला आहे. जमिनीचे पट्टे वाटप, जात प्रमाणपत्रांच्या गैरसोयींमुळे तेथील चार गावांच्या आदिवासीबांधवांनी परराज्यात जाण्याची धमकी दिली आहे. या सीमेवर छुप्या पद्धतीने घातक शस्त्रांची विक्री होते. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील महाराजगुडा येथील घराची स्वयंपाकाची खोली तेलंगणात तर बैठकीची खोली महाराष्ट्रात आहे.

सीमानिश्चितीनुसार दहापैकी चार खोल्या तेलंगणात गेल्या. उरलेल्या खोल्यांना महाराष्ट्राचे नियम लागू आहेत. जिवती तालुक्यातील साडेबारा गावांचा सीमावाद सर्वश्रुत आहे. एकाच निवडणुकीत दोनदा मतदान करणारा बहुदा हा देशातील एकमेव परिसर असावा. भंडारा जिल्ह्यात बावनथडी पुलाने मध्य प्रदेश-महाराष्ट्राला जोडले आहे. ९६ कोटींचा निधी मंजूर झाल्यानंतरही हादऱ्यांमुळे पुलावरील जड वाहतूक सध्या बंद आहे.

कर्नाटक सीमेवर गोळीबार होत नाही. गडचिरोलीत नक्षलवादाने माणसे मरतात. दुर्लक्षाचे मरण तर नेहमीचेच. सिरोंचा हा तिथला शेवटचा तालुका आहे. १९९७मध्ये तत्कालीन आंध्रप्रदेशात जाण्याच्या सिरोंचावासीयांच्या आंदोलनामुळे राज्य सरकार हादरले. रुग्णांना उपचारासाठी लोक हैदराबादला नेतात. देशात फाइव्ह-जीचे वारे आहेत. सीमाभागात बीएसएनएलखेरीज सक्षम पर्याय नाही. लोकांचा भर तेलंगणच्या नेटवर्कवर असतो.

गोदावरी नदीवर तेलंगणने ८० हजार कोटी रुपये खर्चून मेडीगड्डा कालेश्वर धरण उभारले. आपल्याकडील १३८ हेक्टर जमिनीची भूसंपादन प्रक्रिया मात्र रेंगाळली. बॅकवॉटरच्या बुडीत क्षेत्रातील जमिनीचे सर्वेक्षणही नाही. अजूनही छत्तीसगडलगत झोळी बांधून रुग्णांची ने-आण होते.

छत्तीसगड सीमेवरील गोंदिया जिल्ह्यात आरोग्यसेवकांची पदे रिक्त आहेत. परिचर, प्रयोगशाळा तंत्रज्ञही पुरेसे नाहीत. गडचिरोली जिल्ह्यातील उदाहरण सुन्न करते. विनोबा भावे यांच्या निधनानंतर ३५ वर्षांनी ग्रामदानाचे क्रांतिकारक पाऊल उचलणारे मेंढालेखा हे देशातील एकमेव गाव आहे. गावकऱ्यांनी २०१३मध्ये व्यक्तिगत मालकी संपविली.

संपूर्ण जमीन ग्रामसभेच्या नावाने केली. गावाला गटग्रामपंचायतीतून वगळून पंचायतीच्या अधिकारांची अधिसूचना काढणे लगेच अभिप्रेत होते. नऊ वर्षे उलटली. शासनाकडून साधी पोच नव्हती. गाव न्यायालयात गेल्याने अखेर चार आठवड्यांत उत्तराचे आदेश निघाले. अधिवेशनासाठी नेते नागपुरात येतात. दुर्मीळ प्राणी म्हणून 'आम्हांला बघायला' सीमेवर या, असा जोरदार टोमणा दत्ता शिर्केंच्या जनसंघर्ष समितीने नुकताच हाणला. त्यांचे काय चुकले?

**- श्रीपाद अपराजित.**

---

**जन्म हा अखेरचा**

## धर्माचारस्थल - ५



सगुण-साकाराची पूजा करता करता निर्गुण-निराकाराकडे जाण्याचा मार्ग तुम्हांला सापडतो. संसाराचे चिंतन सोडून भगवंताच्या सगुण रुपाच्या ठिकाणी जेंव्हा तुमचे मन स्थिर होते तेंव्हा एकाग्र चित्ताने तुम्ही स्थूलाकडून सूक्ष्माकडे सहज जाऊ शकता.

बाह्यपूजेसाठी भस्म, गंध, बेल इ. बाह्यसामग्री असते, त्याप्रमाणे अंतरंगपूजेसाठी अंतरंगसामग्री असते. अंतरंगपूजेला 'मानसपूजा' असेही म्हणतात. स्थूलशरीराकडून बाह्यपूजा केली जाते, त्याप्रमाणे सूक्ष्म शरीराकडून अंतरंगपूजा केली जाते. हे नीट समजून घेतले पाहिजे. जोपर्यंत मानसपूजा तुमच्या सूक्ष्मशरीराकडून घडत नाही तोपर्यंत तुमची भावना शुद्ध होत नाही. बाह्यपूजा करता करता मानसपूजा करण्याचाही अभ्यास करायला हवा. वृद्धावस्थेत तुम्हांला कदाचित स्नान करता येणार नाही. सरळ बसून तुम्ही पूजा करु शकणार नाही. तेंव्हा काय कराल? पूजा तर केलीच पाहिजे. अशा वेळी तुम्ही बिछान्यावर पडलेले असाल. तरीही मानसपूजा करू शकता. त्यामुळे पूजेत खंड पडणार नाही. म्हणून स्थूलपूजा करता करता मानसपूजा करण्याचा अभ्यास केला पाहिजे.

भगवंताची पूजा करुन आपले कार्य संपत नाही. पूजेनंतर त्याच्या नामाचा जपदेखील केला पाहिजे. ज्याच्या जिभेवर निरंतर भगवंताचे नाम नांदत असते, **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

**जनमानस**

## गुरुजींना अभिवादन...

साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अंमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काही काळ शिक्षक म्हणून नोकरी केली. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टींचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी 'श्यामची आई' ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली 'गीताई' लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या 'भारत छोडो आंदोलनात' त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्रसेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. 'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला.

विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी 'साधना' हे मासिक सुरू केले. या मासिकातून ते जनजागृती करू लागले. दि. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

---

**जयंतीनिमित्त...**

# राष्ट्र शिक्षक : साने गुरुजी

किसान मोर्चेत काम करीत असताना शेतकऱ्यांचे राज्य या देशात यावे असे गुरुजींना गाटत होते. म्हणून गुरुजी म्हणतात **''आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान,**
**शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण''**

आपल्या देशात शेतकऱ्यांचे राज्य आले तर देश बलवान होईल, सशक्त होईल, जगात शोभून दिसेल. म्हणून साने गुरुजी लिहितात -

**''बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो''**

भारत देश जगात शोभून दिसावा म्हणून या राष्ट्रशिक्षकांची धडपड होती. या धडपडीबरोबर मानव समाज प्रेमाने राहावे. खरा धर्म जाणून प्रत्येकांनी गुण्यागोविंदाने राहावेत म्हणून गुरुजींनी **''खरा तो एकची धर्म'' जगाला प्रेम अर्पावे'** हा महान संदेश गुरुजींनी जगाला दिला. अनेक गीताने, अनेक साहित्याने, अनेक विचाराने स्वतःच्या आचरणाने राष्ट्र घडवणाऱ्या राष्ट्रशिक्षकास त्रिवार अभिवादन.

साने गुरुजींचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म दि. २४ डिसेंबर १८९९ साली दापोली तालुक्यातील ''पालगड'' या गावी झाला. वडिलांचे नाव सदाशिवराव आणि आईचे नाव यशोदा. गुरुजींना वडिलांकडून शिस्त आणि आईच्या शिकवणातून प्रेम, भक्तीचा वारसा लाभला. आईच्या प्रेमळ न शिकवणुकीतूनच मी घडलो, असे गुरुजी वारंवार म्हणत व आईलाच ते गुरु मानीत. म्हणून गुरुजी म्हणतात, ''आई माझा गुरु, आई कल्पतरु''. साने गुरुजींचे प्राथमिक शिक्षण पालगडच्या प्राथमिक शाळेत झाले. दि. ११ फेब्रुवारी १९०५ साली गुरुजींचे नाव पहिल्या इयत्तेमध्ये नोंदवण्यात आले. पुढे ११ जून १९०६ रोजी फी भरली नाही म्हणून शाळेतून नाव कमी करण्यात आले. पुन्हा ६ डिसेंबर १९०६ रोजी नाव नोंदवण्यात आले. शाळेची फी भरण्याइतकी त्यांच्याकडे पैसा नव्हता. अत्यंत गरिबीचे हेलकाचे खात वेळोवेळी आईच्या प्रेमळ संदेशाची, शिकवणुकीची शिदोरीसह कोकणातल्या निसर्गरम्य वातावरणात गुरुजींचे, प्राथमिक शिक्षण झाले. शाळेतल्या शिक्षणारोबर आईचे संस्कारक्षम शिक्षण, मूल्याचे अधिष्ठान । गुरुजींच्या बालपणात आई ओतत होती.



''मनाला घाण लागू नये, म्हणून जप हो'' असे सांगून आई श्यामचे मन स्वच्छ ठेवण्याची प्रयत्न करी. 'मुक्या कळ्या तोडू नयेत, आईचे काम हे देवाचे काम त्यात कसली रे लाजायचे'' अशा छोट्या छोट्या प्रसंगानरुप मूल्याचे संस्कार आईने गुरुजींना दिले. जीवन शिक्षणाबरोबर आईने फळा-फुलांवर, गायीवर, निसर्गावर आणि जगावरही प्रेम करायला शिकविले. माध्यमिक शिक्षण १० जून १९१२ पासून दापोली येथील मिशन हायस्कूलमध्ये झाले व उच्च शिक्षण पुणे येथील ''न्यू पूना कॉलेज'' येथे झाले.

पालगड हे गुरुजींची जन्मभूमी, अंमळनेर हे गुरुजींची कर्मभूमी, अंमळनेर हे पूर्व व पश्चिम खानदेशात धुळे व जळगाव जिल्ह्याचा सरहद्दीवरील एक तालुक्याचे गाव संत श्री. सखाराम महाराजाच्या वास्तव्याने पुनित झालेले गाव म्हणून प्रसिध्द होते. अंमळनेरमध्ये राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी 'खानदेश एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था काढली. या संस्थेच्या शाळेत १७ जून १९२४ साली साने गुरुजी शिक्षक म्हणून रुजू झाले. साने गुरुजी साने सर बनले. गुरुजींच्या मनःपिंडाला उचित असे कार्यक्षेत्र गवसले बाल गोपाळांच्या विषयी गुरुजींच्या मनी उंदड जिव्हाळा, प्रेम वसत होते. प्रेम, जिव्हाळ्याला वास्तव्यात प्रकट करण्याची संधी गुरुजींना मिळाली. बालमनाशी एकरुप होऊन त्यांच्या जीवनात अत्तर ओतण्याचे काम गुरुजींच्या बालरुपात केले. हे त्यांच्या काव्यावरुन दिसते.

**''करीन सेवा तव मोलवान, असो अहंकार असा मला न'**
**मदाय आहे बळ अल्प देवा, बलानुरुप मम घेई सेवा''**

गुरुजी शिक्षक म्हणून काम करीत असताना त्यांच्यावर छात्रालयाची जबाबदारी येऊन पडली. गुरुजींनी ते आनंदाने स्विकारले. गुरुजी वसतिगृहातील मुलात रमून गेले. छात्रालयात अनेक प्रकारची मुले, अनेक प्रवृत्तींची मुले होती. त्यांचे विचार भिन्न भिन्न होते. **'भेदभाव मी जाळीन सारे, ऐक्याचे मी सोडीन वारे'** असे गीत म्हणत म्हणत मुलांना समतेची शिकवण गुरुजींनी दिली. गुरुजी स्वतःचे कपडे स्वतः धुत व त्यांच्या आचरणातून मुलांना स्वावलंबी बनवित. शाळेची घंटा पडली की मुले वसतिगृहातून पळत शाळेकडे जायचे. त्यांचे कपडे सामान अस्थाव्यस्त पडलेले असे. ते गुरुजींना राहावले नाही. त्यांनी एकदा येऊन मुलांचे सर्व सामान व्यवस्थित लावले. असे स्वआचराणातून मुलांना साधक बनविणारे साने गुरुजी होते. आजचा विद्यार्थी हा उदयाचा नागरिक आहे. तोच या देशाचा भाग्य उजळविणारा आहे. म्हणून गुरुजी मुलांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती, देश स्वातंत्र्य अशा देशानिष्ठ मूल्यांचा संस्कार गुरुजी मुलांवर केले. म्हणून स्वातंत्र्य संग्रामात अनेक थार स्वातंत्र्यसेनानी उभे राहिले. गुरुजींच्या शिकवणुकीमुळे संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठेला. गुरुजींनी मातृदेवतेच्या जागी त्यांनी राष्ट्रदेवतेची प्राणप्रतिष्ठा केली हाती. म्हणून भारत मातेला बंधनातून मुक्त करण्यासाठी त्यांनी शाळा सोडून दिली आणि देश घडण्याच्या महान कार्याला वाहून घेणारे राष्ट्रशिक्षक बनले.

**- विजय बिज्जरगी, भंडारकवठे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# अत्याधुनिक डफरीन हॉस्पिटल पुढील महिन्यात होणार रूग्णांच्या सेवेत रुजू

## आयुक्तांनी केली पाहणी; उर्वरित काम १५ दिवसात पूर्ण करण्याचे दिले आदेश

सुराज्य/सोलापूर

येथील डफरीन चौकात असलेल्या सोलापूर महानगरपालिका अंतर्गत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाचे नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. जानेवारी महिना अखेरपासून हे हॉस्पीटल रूग्णांच्या सेवेत येणार आहे. उर्वरित काम १५ दिवसात पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या.



येथील बालाजी अमाईन्सच्या माध्यमातून दीड कोटी रूपयाच्या सीएसआर फंडातून या हॉस्पीटलच्या नुतनीकरणाचे काम सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात आले असून शुक्रवारी महापालिका आयुक्त शितल तेली-उगले व बालाजी अमाईन्स संचालक राम रेड्डी यांनी पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, शहर लेखा व्यवस्थापक सिध्देश्वर बोरगे, डॉ. मंजिरी कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर सोडल, झोन अधिकारी सारिका अकुलवार , विद्युत विभागाचे राजेश परदेशी आदी उपस्थित होते. या हॉस्पीटलच्या नुतनीकरणाच्या या कामासाठी आतापर्यंत दीड कोटी रूपयांपर्यंत खर्च आला आहे. नुतनीकरणाचे उर्वरित काम येत्या १५ दिवसात पूर्ण करण्याच्या सुचना आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या आहेत. त्यादृष्टीने प्रशासन कामाला लागले आहे. या हॉस्पीटलसाठी आवश्यक डॉक्टर व नर्सिंग स्टाफ उपलब्ध आहे. तसेच लागणारी औषधं, बेड व अन्य आवश्यक साहित्यांची खरेदी पूर्ण झाली आहे, असे महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

### बालाजी अमाईन्सच्या सीएसआर फंडातून झाले काम

येथील बालाजी अमाईन्सच्या दीड कोटी रूपयाच्या सीएसआर फंडातून हे काम करण्यात येत आहे. काम अतिशय चांगले झाले आहे. भौतिक सोई सुविधा आणि साधन सामग्री अत्याधुनिक केल्या आहेत.१५ दिवसांत काम पूर्ण होईल. लवकरच हे प्रसूतीगृह सेवेत सुरु होणार आहे. ऑपरेशन थिएटर अत्याधुनिक आहे. ऑपरेशन टेबल, लॅम्प व सर्व अत्याधुनिक आहे.

### अत्याधुनिक नवजात शिशु अतिदक्षता विभाग होणार

शासन निधीतून याठिकाणीच अत्याधुनिक नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे काम करण्यात येत आहे. या अतिदक्षता विभागात १२ बेड्स उपलब्ध राहणार आहे. अतिशय सुसज्ज असे हे हॉस्पिटल होईल. अत्याधुनिक प्रसूतिगृह व नवजात शिशु अतिदक्षता विभाग दोन्हीही जानेवारी अखेरपर्यंत सेवेत उपलब्ध होणार आहे असे उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.



## कारमधून वाहतूक होणारी शंभर लिटर हातभट्टी दारु जप्त

सोलापूर : मोहोळ तालुक्यातील कोळेगाव हद्दीत एका मारुती स्विफ्ट कारमधून वाहतूक करण्यात येणाऱ्या १०० लिटर हातभट्टी दारुचा साठा जप्त केला आहे. उत्पादन शुल्क विभाग पंढरपूरचे प्रभारी दुय्यमनिरिक्षक अंकुश आवताडे यांनी मोहोळ-सोलापूर रोडवर कोळेगाव हद्दीत सापळा रचला.त्यांनी मारुती स्विफ्ट कार (एमएच ४५.एन.६८%८) थांबवून झडती घेतली असता त्यात सात प्लास्टीक कॅनमध्ये १०० लिटर हातभट्टी दारु मिळून आली. वाहनचालक हणमंत वसंत चव्हाण (रा.बुधवार पेठ, मोहोळ) यास जागीच ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या गुन्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने ६ हजार २५० रुपयांची हातभट्टी दारु व कार असा एकूण ३ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पवन मुळे, दुयमनिरिक्षक अंकुश आवताडे, सहायक दुयमनिरिक्षक जीवन मुंढे, कर्मचारी भाग्यश्री शेरखाने व गणेश रोडे यांच्या पथकाने पार पाडली. उत्पादन शुल्क विभागाने डिसेंबर महिन्यात अवैध दारुविरुद्ध राबविलेल्या मोहिमेत जिल्हाभरात एकूण ११६ गुन्हे नोंदविले असून १२७ आरोपींना अटक केली आहे, तसेच २६ वाहनेही जप्त केली आहेत. या कालावधीत विभागाकडून ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## श्री नंदिकेश्वर विद्यालयाचे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत यश

माढा : पंढरपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या,श्री नंदिकेश्वर विद्यालय उपळाई बुद्रुक विद्यालयाने उज्वल यश संपादन केले.विद्यालयाच्या ६ विद्यार्थिनींची पुणे विभागस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली असून यशस्वी खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. यामध्ये १४ वर्षे मुलींच्या वयोगटात राजनंदिनी वागज हिने १०० मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. तिची पुणे विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.तसेच स्वप्नाली देशमुख हिने ६०० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. ४x१०० मीटर रिले स्पर्धेत १४ वर्षे मुलींचा संघ सोलापूर जिल्ह्यात द्वितीय आला. यामध्ये राजनंदिनी वागज, काजल पवार, साक्षी चव्हाण, स्वप्नाली देशमुख व मैथिली थोरात यांनी यश मिळवले. ४x१०० मीटर रिले स्पर्धेत १४ वर्षे मुलांचा संघ सोलापूर जिल्ह्यात तृतीय आला. यामध्ये अमन काझी, रोहित जाधव, संजोतराजे कोळेकर, निरंजन वाकडे व सार्थक सावंत यांनी यश संपादन केले. १७ वर्षे मुलींच्या धावणे स्पर्धेत निकिता सावंत हिने ८०० मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. ४x४०० मीटर रिले स्पर्धेत १७ वर्षे मुलींचा संघ सोलापूर जिल्ह्यात प्रथम आला. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक शब्बीर तांबोळी सर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक क्रीडाशिक्षक यांचे क्रीडा अधिकारी श्री गणेश पवार साहेब तसेच मुख्याध्यापक औदुंबर गायकवाड, स्कूल कमिटीचे सिताराम गायकवाड, कृष्णा घाडगे, डॉ. नानासाहेब शेंडे यांनी अभिनंदन केले आहे.

## सरकारच्या दडपशाहीचा राष्ट्रवादीने जोडो मारो आंदोलन करीत केला निषेध

मोहोळ : जनतेच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली तर सरकारचे अपयश उघड होईल, या भीतीपोटी अध्यक्षांमार्फत सभागृहात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे निलंबन करून दडपशाही सुरू असून जनतेच्या प्रश्नांना सामोरे न जाणाऱ्या डरपोक सरकारच्या या दडपशाही चा निषेध मोहोळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जोडो मारो आंदोलन करीत करण्यात आला. संसदीय मर्यादा व परंपरा पाळणारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असुन लोकशाहीच्या सभागृहात जनतेच्या प्रश्नावर विरोधकांना बोलू दिले जात नाही. विरोधकांचा आवाज दडपला जात आहे. त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या एका वक्तव्यावर विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी व भाजपा सरकारने पक्षपातीपणाने निलंबनाची कारवाई केली आहे. विरोधी पक्षनेते अजितदादा पवार सातत्याने विनंती करीत असताना देखील विधानसभा अध्यक्षांनी ऐकले नाही. जनतेच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली सरकारचे अपयश उघड होईल या भीतीपोटी अध्यक्षांच्या मार्फत ही दडपशाही सुरु आहे. जनतेच्या प्रश्नांना सामोरे न जाणाऱ्या डरपोक सरकारचा व सभापतींचा जोडो मारो आंदोलनाने तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जोडो मारो आंदोलन करीत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मोहोळचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे तालुका उपाध्यक्ष हेमंत गरड, शहराध्यक्ष रूपेश धोत्रे, महिला शहराध्यक्ष यशोदा कांबळे, मुश्ताक शेख, राजेश सुतार, अनंता नागणकेरी, संतोष खंदारे, अझरूद्दीन शेख, जावेद बागवान, गौतम क्षिरसागर, राहुल कसबे, नागेश बिराजदार, अभय गायकवाड, सुरज तलफदार, अनिकेत सोनवणे आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त

### सुभाष करंडे



चिखली : सारोळे (ता.मोहोळ) येथील रहिवासी तथा माजी सरपंच सुभाष उर्फ बलभीम सोपान करंडे यांचे दि. २३ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ८३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### शंकर क्षीरसागर



उत्तर सोलापूर अकोले काठी येथील माजी सरपंच, पंचायत समिती उत्तरचे माजी उपसभापती शंकर माणिक क्षीरसागर यांचे (वय ८०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सूना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.



## बलात्काराच्या प्रकरणात एकास जामिन

सुराज्य/बार्शी

कॉलेजला जाणाऱ्या तरूणीचे अपहरण करून जबरदस्तीने लग्न करून बलात्कार केल्या प्रकरणात आरोपी ज्ञानेश्वर सोमनाथ तांबे यास बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश चव्हाण एल.एस. यांनी २५ हजारांच्या जामीनावर सोडण्याचे आदेश दिले. भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय येथे बी.सी.ए. प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थीनीची कॉलेजला जाता येता आरोपी ज्ञानेश्वर तांबे यांची ओळख झाली. तसेच ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. आरोपी ज्ञानेश्वर तांबे व त्याच्या आईने फिर्यादिस पुण्याला नेले व लग्न लावून दिले.

तिला धमकावून तिच्या कुटूंबयांच्या विरोधात पोलीस अधिक्षक, सोलापूर यांचेकडे तक्रार अर्ज द्यायला लावले मनाविरूध्द शारीरिक संबंध ठेवले. अशी तक्रार पिडीतेने बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे दिल्यावरून आरोपी ज्ञानेश्वर तांबे, मावशी अश्विनी जाधव व भाऊ माऊली तांबे यांना अटक करण्यात आली. सदर आरोपींनी बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय येथे जामीनासाठी अर्ज केला. जामीन अर्जाची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश चव्हाण एल.एस. यांचेसमोर झाली. आरोपींच्या वकीलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपींना जामीनदार मुक्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. यात आरोपींतर्फे अॅड. महेश जगताप, अॅड. वंदना यादव, अॅड. अभिजीत जगताप तसेच सरकार पक्षातर्फे अॅड. कदम मॅडम यांनी काम पाहिले.

## १९ ते २५ डिसेंबर कालावधीत जिल्हा प्रशासनात सुशासन सप्ताह

### जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकरांनी केल्या अधिकाऱ्यांना सूचना

सुराज्य/सोलापूर

केंद्रशासनाच्या आदेशाने जिल्हाप्रशासनात १९ ते २५ डिसेंबर या कालावधित सुशासन सप्ताह राबवला जाणार आहे. शासकिय कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची कामे संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तळमळीने वेळेत व पारदर्शकतेने करावीत अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी बैठकीत दिल्या.

या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, तहसिलदार अंजली मरोड, तहसिलदार दत्तात्रय मोहाळे, नायब तहसिलदार आर.व्ही.पुदाले, बालाजी बनसोडे, माजी जिल्हाधिकारी गोकुळ मवारे, केशव शिंदे तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी कार्यालयात आलेल्या नागरिकांची कामे तळमळीने, निष्ठेने व पारदर्शीपणे केल्यास सुशासन सप्ताह राबविण्याची गरजच शासनास पडणार नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो तेथे जे अधिकारी आपणांस मिळाले आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाचा योग्य वापर करून सर्वसामान्यांची कामे तात्काळ मार्गी लावावीत. प्रत्येक काम मुदतीत पूर्ण करावे. तसेच तक्रारींचा तात्काळ निपटारा करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्याच्या सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. यावेळी माजी जिल्हाधिकारी मवारे यांनी काम करताना येणाऱ्या अडचणी, त्यावर करावयाचे उपाय याबद्दल सोदाहरण मार्गदर्शन केले. तसेच शासकिय कर्मचाऱ्यांना अधिकच्या कामामुळे जो ताण तणाव जाणवतो या तणावापासून आपल्याला कसे दूर राहता येईल याबाबत लचे मार्गदर्शन केशव शिंदे यांनी केले.

> सुप्रशासन हा चर्चेचा विषय नसून यावर तात्काळ कृती करण्याची गरज आहे. सर्वांनी नियोजनबध्द पध्दतीने कामकाज करावे. येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे काम आपलेच काम आहे असे समजून केल्यास कोणाचीही कामे प्रलंबित राहणार नाहीत.
>
> **- तुषार ठोंबरे (अप्पर जिल्हाधिकारी)**
>
> कर्मचाऱ्यांनी मान्यवरांनी दिलेल्या तसेच शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून कामे केल्यास आपल्या जिल्ह्यामध्ये नक्कीच सुप्रशासन निर्माण होईल. जिल्ह्यात सुप्रशासन निर्माण करण्यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत
>
> **- शमा पवार (निवासी उपजिल्हाधिकारी)**

## महाराष्ट्र ऑलिंपिकनिमित्ताने पुण्याचे क्रीडावैभव देशपातळीवर पोहोचविण्याची संधी : विभागीय आयुक्त राव

पुणे : महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित करण्यात येत असलेल्या मिनी ऑलिंपिक स्पर्धेच्या निमित्ताने पुण्याचे क्रीडा वैभव आणि क्रीडा क्षेत्रातील ओळख देशपातळीवर पोहोचविण्याची संधी आहे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी केले.

विधानभवन येथे महाराष्ट्र ऑलिंपिक स्पर्धा आयोजनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस क्रीडा आयुक्त सुहास दिवसे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेचे सचिव नामदेव शिरगावकर, उपायुक्त नयना बोदार्डे, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, माहिती उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर उपस्थित होते.

राव म्हणाले, महाराष्ट्र ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन पुण्यासाठी गौरवाची बाब आहे. दोन दशकानंतर असे आयोजन पुण्यात होत आहे. यासोबत जी-२० बैठका आणि एटीपी टेनिस स्पर्धेचे देखील आयोजन नववर्षाच्या सुरुवातीला होत आहे. त्यामुळे स्पर्धा आयोजनाची चांगली तयारी करण्यासोबत पुण्याचे ब्रँडींगदेखील करण्यात यावे.



शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उत्तम क्रीडा कौशल्य पाहण्याची संधी असल्याने त्यांनाही आयोजनात सहभागी करून घ्यावे. स्पर्धेसाठी वाहतूकीचे योग्य नियोजन करावे. त्यासाठी वाहतूक मार्शलची नेमणूक आवश्यक ठिकाणी करण्यात यावी. खेळाडूंना स्पर्धा कालावधीत आवश्यक आरोग्य सुविधा देण्यासाठी पथकांची नेमणूक करण्यात यावी. खेळाडूंची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या. क्रीडा आयुक्त सुहास दिवसे म्हणाले, महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा २ ते १२ जानेवारी २०२३ या कालावधीत पुणे येथे होत आहेत. या स्पर्धेत ३९ क्रीडा प्रकारांचा समावेश असून सुमारे ९ हजारापेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. राज्यात क्रीडा वातावरण निर्माण करणे, खेळाला उत्तेजना देणे, खेळाडूंना नैपुण्य दाखवण्याची संधी मिळावी हा या आयोजनामागचा उद्देश आहे. बालेवाडी येथे २५, जळगाव-४, नाशिक-२, नागपूर-४, मुंबई-२, बारामती, एमआयटी, पुणे, औरंगाबाद व पूना क्लब येथे प्रत्येकी १ याप्रमाणे महाराष्ट्रात स्पर्धांचे आयोजन होईल. शिरगावकर म्हणाले, राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याची कामगिरी उंचावण्याच्या हेतूने महाराष्ट्र ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा स्पर्धांमुळे राज्यात क्रीडाक्षेत्राला अनुकूल वातावरण निर्माण होईल. या क्रीडा स्पर्धांमुळे क्रीडा क्षेत्राचे माहेरघर म्हणून पुण्याची ओळख होईल.

महाराष्ट्र ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा जिल्हा आणि राज्यासाठी महत्वाच्या असून स्पर्धांसाठी प्रशासनाच्यावतीने आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी सांगितले. यावेळी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. खेळाडू आणि प्रशिक्षकांना योग्य सुविध देण्याच्यासूचना आयुक्तराव यांनी संबंधितांना दिल्या. बैठकीला विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ‘वसुंधरा’ महाविद्यालयात व्याख्यान

सोलापूर : येथील वसुंधरा कला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राहक दिन आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शाहीर रमेश खाडे यांनी ’ग्राहक संरक्षण व हक्क’ या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीना गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्ष आढाव्यात प्रा. डॉ. तानाजी देशमुख यांनी ग्राहकांनी वस्तू विकत घेताना पर्यावरणाविषयी जागरूक राहण्याचे आवाहन करताना ग्राहक हा राजा असून वस्तू वा सेवा खरेदी करताना जागृत असावं असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रमाचा उद्देश आणि प्रास्ताविक प्रा. डॉ. राजाराम पाटील, परिचय प्रा. सुहास उघडे, आभार प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे तर सूत्रसंचालन डॉ. किशोर जोगदंड यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## पंडित नितीशचंद्र यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

कथा व्यास पंडित श्री नितीशचंद्रजी यांच्या श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन रविवार २५ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. शुभमंगल लॉन्स अनुपम पार्क, सैफुल येथे दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत ही कथा चालणार आहे, अशी माहिती महेश देवकर आणि अशोक पाटील यांनी दिली.

रविवार २५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता कलश यात्रा काढण्यात येणार आहे. या कलश यात्रेत महिला भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. श्री शिवमहापुराण महात्म्य, संध्यादेवी चरित्र, त्रिपुरासुर वध, जालंधर उद्धार, द्वादश ज्योतिर्लिंग महात्म्य, उमा संहिता, वायव्य संहिता तसेच भगवान श्री शंकराच्या विविध अवतारांच्या कथा मथुरा येथील कथा व्यास पंडित श्री नितिशचंद्रजी सांगणार आहेत. याचा लाभ भाविकांनी घ्यावा व अधिक माहितीसाठी महेश देवकर यांच्याशी ८८८८११४७७७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महेश देवकर आणि अशोक पाटील यांनी केले आहे.

# डॉ.बाबासाहेबांचे मूळ विचार वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहचावेत : वाघमारे

## ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे जशीच्या तशी‘ मालिकेतील तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन

सोलापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ विचार समाजापर्यंत पोहचवणे गरजेचे आहे. वाडी, वस्तीतील मुलांपर्यंत मोफत पुस्तके पोहचली पाहिजेत. डॉ. कोरे यांच्या कार्याला सर्वांनी कृतीशील हातभार लावला पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांनी व्यक्त केली.

डॉ. सुरेश कोरे यांनी मोफत वितरणासाठी स्वखर्चातून उज्ज्वल प्रकाशनच्या माध्यमातून ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे जसीच्या तशी - ३ ’ हे स्त्रिविषयक विचारांचे पुस्तक तयार केले आहे. त्याचे प्रकाशन भन्ते बी. सारिपुत्त यांच्या उपस्थितीत मिलिंद नगर बुध्द विहार येथे शुक्रवारी सकाळी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी कामगार नेते अशोक जानराव, अर्थसहाय्य करणाऱ्या डॉ. जोत्सना कोरे, डॉ. अरुणकुमार इंगळे, वैद्यकिय अधिकारी डॉ. खरे, बाळकृष्ण गजघाटे, एम. डी. शिंदे, राजेंद्र माने, धम्मरक्षीता कांबळे, रमाताई ढावरे, मल्लिकार्जुन बिराजदार, व्हि. डि. गायकवाड, गौमत गायकवाड, पाथरूट,



संदीप उडाणशीव, नागसेन माने, पत्रकार किरण बनसोडे, विजय गायकवाड, आबासाहेब साबळे, शारदा गजभिये, सूर्यभान गजभिये, प्रकाश जौजट, मीनाक्षी बनसोडे, रत्नशील कांबळे, आदी उपस्थित होते. डॉ. सुरेश कोरे यांनी यापूर्वीही डॉ. आंबेडकरांच्या भाषणाची दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यानंतर तीन महिन्यात हे तिसरे पुस्तक प्रकाशित केले आहे. प्रस्ताविक भाषणात डॉ. सुरेश कोरे यांनी डॉ. आंबेडकर यांचे मार्गदर्शक विचार दर महिन्याला एक पुस्तक या रूपाने वर्षभर राबविणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन अण्णासाहेब वाघमारे यांनी केले तर शेवटी आभार डॉ. ज्योत्स्ना कोरे यांनी मानले.

## बहुजन हक्क अभियान संघटनेतर्फे निराधारांना ब्लँकेट वाटप

**सोलापूर** : येथील बहुजन हक्क अभियान या संघटनेच्या वतीने सिध्देश्वर मंदिर परिसरातील निराधारांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. थंडीच्या दिवसात हे निराश्रित तसेच भिक्षेकरू लोक कुडकुडत रात्र काढत असतात.त्याचा विचार करून हा उपक्रम हाती घेण्यात आला. शहर काँग्रेसचे अध्यक्ष मोहन थळंगे यांनी यासाठी सहकार्य केले. साधारण १५० लोकांना चादरीसह ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक दयानंद बनसोडे, अहद काझी, विशाल कांबळे, निसार वस्ताद आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बटरफ्लाय इंग्लिश स्कूलचे क्रीडा स्पर्धामध्ये यश

**सोलापूर** : बटरफ्लाय इंग्लिश मीडीअम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शहरस्तरीय आंतरशालेय कराटे, किक बॉक्सिंग, सिकई, मार्शल आर्ट, रग्बी व मैदानी स्पर्धा अशा विविध खेळांत यश मिळवले. कराटे मध्ये १४ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सादिया शेख द्वितीय क्रमांक व संचिता सोनवणे व शुभम रोकडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला आहे. सिकाई मार्शल आर्टमध्ये १४ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सादिया शेख प्रथम क्रमांक व संचिता सोनवणे द्वितीय क्रमांक मिळविले. १७ वर्षाखालील मुलांमध्ये अमीरहमजा मुल्ला याने सुवर्ण पदक व जितेश रिजोरा याने रजत पदक मिळवला तर मुलीं मध्ये मुस्कान असरानी हिने रजत पदक व मृणाल सरवदे व श्रुतिका कलादगी यांनी कास्य पदक मिळविले. १७ वर्षाखालील किक बॉक्सिंग मुलांमध्ये अमीरहमजा मुल्ला, जितेश रिजोरा व अनिकेत शिवसिंगवाले यांनी सुवर्ण पदक मिळविले. १४ वर्षाखालील रग्बी मुलांच्या स्पर्धेत मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक व मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.१४ वर्षाखालील मैदानी थाळीफेक या स्पर्धेत प्रियंका एकबोटे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. आर. पाटील, उपाध्यक्ष शरद नागांवकर, श्री व्ही. जे. देवणीकर सचिव डॉ . एस . ए . हलकुडे, खजिनदार श्री शंकर पाटील, प्रशालेच्या मुख्याध्यापिका विजया बिराजदार, रश्मी पुर्वत, यांनी कौतुक केले तर सर्व यशस्वी खेळाडूंना क्रिडा प्रशिक्षिका आरती मलजी, क्रिडा प्रशिक्षिक मनोज बाळगे, क्रिडा शिक्षिका रफिया लंगोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

## लोकमंगल कर्मचारी पतसंस्थेचे नवे संचालक मंडळ बिनविरोध

**सोलापूर** : लोकमंगल कर्मचा-यांची सहकारी पतसंस्थेच्या नवीन संचालक मंडळाची नुकतीच बिनविरोध निवड झाली. नवीन संचालक मंडळाची सभा पार पडली. अध्यासी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विद्याधर माने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत नूतन चेअरमन पदासाठी सचिन हरी जाधव यांचे नाव रमेश मच्छिंद्र काळे यांनी सुचविले. त्यांना राजेंद्र बाळासाहेब देशमुख यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमन पदासाठी बाबासाहेब रंगनाथ खराटे यांचे नाव श्रीशैल सिध्दप्पा लोखंडे यांनी सुचविले. त्यांना माधुरी लक्ष्मीकांत कुमकाळे यांनी अनुमोदन दिले. सचिव पदासाठी सुदन नागनाथ सुरवसे यांचे नाव तायण्णा परसप्पा काळे यांनी सुचविले. त्यांना ज्योती जानकर यांनी अनुमोदन दिले. तिन्ही पदासाठी एकच अर्ज आल्याने मा. अध्यासी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विद्याधर माने यांनी ही निवड बिनविरोध झाल्याचे घोषीत केले. यावेळी संस्थेचे माजी चेअरमन अनिता जगदाळे, माजी सचिव, सचिन परमशेट्टी, नूतन संचालक , रमेश काळे, , राजेंद्र देशमुख, श्रीशैल लोखंडे, माधुरी कुमकाळे, ज्योतीजानकर, कु. नाजमीन शेख, सरोजनी निकम, तायण्णा काळे, आदि उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष आ. सुभाष देशमुख साहेब, मनीष देशमुख रोहन देशमुख, लोकमंगल समूहांच्या सर्व विभाग प्रमुख यांनी नूतन संचालक मंडळाचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.



## पाखर संकुलमध्ये रक्तदान शिबिर

**सोलापूर** : पाखर संकुल बालगृह, जुळे सोलापूर येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये परिसरातील अनेक रक्तदात्याने उत्स्फूर्तपणे रक्तदान करुन आपला सहभाग नोंदवला. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या कार्यकारी अधिक्षिका निकिता एकबोटे, वरिष्ठ समजसेविका संतोषी सुतार, सहाय्यक समाजसेविका दिपाली मदने, सुप्रिया गायकवाड, ज्योती मोरे तसेच पाखर संकुलच्या सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी, संस्थेच्या संस्थापक श्रीमती शुभांगी ताई बुवा यांचा ७० वा वाढदिवस पारंपारिक पद्धतीने औक्षण करून आणि ओंकार देऊन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव श्री. विक्रम कांबळे सर उपस्थित होते. या कार्यक्रमात संस्थेतील बाळांचाही सहभाग दिसून आला.

## उत्तर सोलापूर प्रिमियर लीग यशराज पडसाळी संघाला विजेतेपद

सुराज्य/उत्तर सोलापूर पृथ्वीराज माने युवा मंच उत्तर सोलापूर अध्यक्ष सुनिल जाधव यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भैय्यासाहेब वळसंगकर क्रीडांगण कारंबा येथे दिनांक १६ ते २२ डिसेंबर दरम्यान आयोजित केलेल्या उत्तर सोलापूर प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद यशराज पडसाळी संघाने पटकावले. स्पर्धेत उत्तर तालुक्यातील बारा संघांनी सहभागी होते. अंतिम सामना कोंडी येथील ए के सी सी व यशराज पडसाळी झाला. यशराज पडसाळी संघाने बाजी मारली व उत्तर सोलापूर प्रिमियर लीग चे प्रथम पारितोषिक पटकावले.विजयी संघास नरोटेवाडीचे सरपंच उमेश भगत, कारंबाचे सरपंच तुकाराम चव्हाण, सुनिल जाधव,नागेश कोकरे, रोहन ढेपे, ज्ञानेश्वर जगताप,पोलीस पाटील तानाजी यादव, महेंद्र खटके यांच्या उपस्थितीत विजेत्या यशराज पडसाळी संघास रोख ३१ हजार रुपये व चषक, उपविजेता ए के सी सी कोंडी संघाला २१ हजार रुपये व चषक, तृतीय ब्राव्हो इंडियन्स नान्नज संघाला ११ हजार रुपये व चषक, उत्तेजनार्थ म्हणून यशराज कौठाळी संघाला ७ हजार रुपये व चषक देण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज अक्षय लोंढे, उत्कृष्ट गोलंदाज नवनाथ हुक्के, मालिकावीर अजित बेलभंडारे यांना चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी भगवान कदम, गणेश शिंदे, सतीश जगताप, संभाजी भोसले, दैदिप नवगिरे, विनोद माने,समालोचक शंकर पवार, ओंकार शिंदे, तुषार पवार, ईश्वर दिवाण, विशाल भोसले, दत्तात्रय जाधव,बालाजी साठे, उमेश इंगळे, दत्ताभाऊ भोसले, विजय सोलकर, अस्लम शेख,अरुण बोराडे, आकाश जाधव उपस्थित होते.

# जिल्ह्यात 'येळवस' उत्साहात साजरी

## काळ्या आईचे उपकार स्मरण्याचा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस

सुराज्य/सोलापूर

**वेळ अमावस्या (येळवस) जिल्ह्यातील शेत शिवार शेतकऱ्यांनी फुलून गेली होती. काळ्या आई (लक्ष्मी) चे उपकार स्मरण्याचा आणि कृतज्ञता व्यक्त करीत शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात शेतातील पाच पांडवाची विधिवत पुजा करून अन्नधान्य बरकतीची अपेक्षा व्यक्त केली. दरम्यान मार्गशीर्ष अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो. नैसर्गिक संकट कितीही आले तरी काळ्या आईची (लक्ष्मीची) पुजा करण्याच्या परंपरेत शेतकऱ्यांनी कधीही खंड पडू दिला नाही.**



भारतीय संस्कृती ही प्रामुख्याने कृषी संस्कृती आहे. सर्व प्राणिमात्रांची मूलभूत गरज म्हणजे अन्न. त्यामुळे मानवी जीवनात अन्न-धान्याचे महत्त्व अविवाद्य असल्याने आपल्या पूर्वजांनी त्यासंबंधी विशेष विचार केलेला आढळून येतो. हजारो कुटुंबाचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने शेती कसणारा वर्गही मोठा आहे. शेतीला 'धनलक्ष्मी' मानणारा शेतकरी बांधव शेतातील उत्पन्नाची समृद्धी व भरभराटी होण्याची मनोकामना व्यक्त करत काळ्याआईची मनोभावे विधीवत पूजा करतात. ही आई आपल्याला धान्य देते, पालनपोषण करते, तिचे उपकार स्मरण्याचा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. प्रत्येक शेतात घरातील लोक,पै पाहुणे, मित्रमंडळी यांच्यामुळे सगळे शिवार माणसाने फुलून जातात.ज्या भागात जे मुख्य पीक असते त्या भागात त्याला लक्ष्मी म्हटले जाते. या दिवसांत वेळा अमावास्येचा मेनू हा थंडीला सामोरे ठेऊन तयार केला जातो. हे पदार्थ थंडीच्या दिवसात खाणे आरोग्यासाठी अतिशय चांगले असते. या काळात रान विविध भाज्यांनी फुललेले असते. त्यामुळे सोळा भाज्या एकत्र करून त्याची भाजी बनवली जाते. बाजरी ऊर्जा देते म्हणून बाजरीचे पीठ उकडून त्याचे उंडे बनवले जातात. गुळसुद्धा उष्ण असतो म्हणून गूळ घालून गव्हाची खीर आणि हे सगळे पचवण्यासाठी ज्वारीचे पीठ रात्रभर ताकात मुरवून केलेली आंबील, या सर्व पदार्थांनी आधी धरणीमातेची ओटी भरतात.

### वन भोजनाचा घेतला आस्वाद

शिवारात ओलीता खालील पिके बहरात आले असले तरी पिकांवरील कीड, अळीचे विघ्न दुर करण्याचा खटापोट करावा लागतोय. नैसर्गिक संकटाचे कितीही धुके आले तरी शेतकरी कुटुंबासाठी वेळ अमावस्याचा सण एक पर्वणीच असते. बैलगाडीतुन सहकुटुंब शेताकडे जाण्याची मजा औरच असते. अजुनही बरेच शेतकरी कुटुंबिय बैलगाडीतुन शेताकडे जात होते. तर बहुतांश जण दुचाकी, चारचाकी व ट्रॅक्टरमधुनही शेताकडे जात होते. सजगुऱ्याचे (बाजरी) उंडे, कानवले, बाजरी व ज्वारीच्या कडक भाकरी, पालेभाज्या, वटाणा, हरभऱ्याचे हिरवे दाणे, बेसन यापासुन बनविलेली भाजी (भज्जी), वांगे, कांद्याची पात व हिरव्या मिरच्यापासुन तयार केलेले भरीत, गव्हाची खीर, कोंदीच्या गोड पोळ्या, आंबट भात (खिचडा) आदी खाद्य पदार्थाची मेजवाणी घेत शेतकरी बांधव कुटुंबासह, मित्रमंडळीनी वनभोजनाचा आस्वाद घेतला.या दिवशी सगळ्याचा संध्याकाळपर्यंत शेतात मुक्काम असतो. उन्हं उतरली की लोक परतीच्या वाटेला लागतात. एक दिवस काळ्या आईच्या सान्निध्यात राहायच या सणाची पुढच्या वर्षी पर्यंत आतुरतेने वाट पाहिली जाते.

# पंढरपूर तालुक्यातील अवैद्य खडी क्रशर पुन्हा सील

सुराज्य/पंढरपूर

तालुक्यांमध्ये बेकायदेशीर खडी क्रशरच्या माध्यमातून बेसुमार दगड उत्खनाचे काम खडी क्रशर मालकांनी केले होते. भुसुरुंग स्फोट घडवून दगडाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात असल्या प्रकरणी दादासाहेब चव्हाण यांनी कारवाईची मागणी केली होती. याप्रकरणी अप्पर तहसीलदार यांनी पंढरपुर तालुक्यातील सर्व बेकायदेशीर खडी क्रशर सील बंद केले.

गेल्या वर्षी सीलबंद केलेले खडी क्रशर पुन्हा सीलबंद केले आहेत. मधल्या काळात कोणाच्या आशीर्वादाने बेकायदेशीर खडी क्रशर सुरू करण्यात आले होते? असा प्रश्न या निमित्ताने महसूल प्रशासनाच्या कार्यशैलीवर निर्माण होत आहे. पंढरपूर तालुक्यात वाळू माफिया, सोबत दगड, मुरूम, माती माफियांनी तोंडवर काढले आहे. पंढरपूर तालुक्यातून बेसुमार दगड आणि मुरमाचा उत्खनन केली जाते. वारंवार तक्रार करून देखील प्रशासन याकडे दुर्लक्ष करताना



पाहायला मिळत होतं. पंढरपूर तालुक्यातील सुरू असलेले बेकायदेशीर खडी क्रशर बंद करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी दादासाहेब चव्हाण हे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर २६ डिसेंबर पासून आंदोलन करणार आहेत.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने पंढरपूर तालुक्यातील सर्व बेकायदेशीर खडी क्रशर सीलबंद केले आहेत. उपजिल्हाधिकारी दर्जाचे अप्पर तहसीलदार समाधान घुटुकडे यांनी बेकायदेशीर खडी क्रशर मालकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यानंतर बेकायदेशीर खडी कशाला मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र बेकायदेशीर खडी क्रशरची यादी प्रसिद्धीकरणासाठी महसूल प्रशासनाकडे मागितले असता यादी देण्यास नकार देण्यात आला असून माहितीचा अधिकार वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**सील केलेले खडी कशाला महसूल प्रशासनाने केले पुन्हा सील**

आंदोलनाच्या तोंडावर महसूल विभागाने पुन्हा खडी क्रशर सीलबंद केले आहेत. मात्र, यावर्षी जानेवारी महिन्यामध्ये महसूल प्रशासनाने बेकायदेशीर खडी क्रशर सीलबंद केले होते. मात्र कोणाच्या आशीर्वादाने सीलबंद खडी क्रशर सुरू करण्यात आले? कोणाचे आर्थिक लागेबांधे आहेत. यामध्ये सामील अधिकाऱ्यांचे निलंबन होईपर्यंत पुणे विभागीय आयुक्त कार्यासमोर आंदोलन करणार आहे.

**- दादासाहेब चव्हाण, आंदोलनकर्ते**

## पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध योजनेसाठी आवाहन

सुराज्य/सांगोला

नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत दुधाळ गाई म्हशींचे गट वाटप करणे, शेळी - मेंढी गट वाटप करणे, १००० कुकुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसाह्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५ + ३ तलंगा गट वाटप या योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२२ - २३ या वर्षात राबवली जाणार आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी व पशुसंवर्धन विभाग अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत असे आवाहन तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉक्टर असलम सय्यद यांनी केले आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकासह पशुपालक व शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देत, त्यांना शाश्वत अर्थजनाचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या पशुसंवर्धन विभागाने विविध योजना व उपक्रमाद्वारे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे.

# रस्ता सुरक्षेसाठी सोलापूर आरटीओचे 'सुरक्षा कवच'

## 'आपत्कालीन वाहनांना मार्ग द्या' याची जनजागृती करणारे मॉडेल कार्यान्वित

सुराज्य/अकलूज

आपत्कालीन वाहने ही अशा प्रकारची वाहने आहेत जी आपत्कालीन परिस्थितीत लोकांना मदत करण्यासाठी वापरली जातात. यामध्ये गंभीर रुग्ण, इमारतीला लागलेली आग इत्यादींचा समावेश आहे. आपत्कालीन वाहनांमध्ये अँब्युलन्स व अग्निशमन दलाच्या गाड्या कार्यरत आहेत.

प्रत्येकाने या वाहनांना जाण्यासाठी रस्ता द्यावा याची जनजागृती करणारे मॉडेल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर येथे 'सुरक्षा कवच' या रस्ता सुरक्षेच्या उपक्रमांतर्गत कार्यान्वित करण्यात आले



आहे. याचे उदघाटन जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. यावेळी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.मोटार वाहन कायद्यात २०१९ मध्ये केलेल्या नवीन सुधारणेनुसार आपत्कालीन वाहनांचा मार्ग रोखणाऱ्यांसाठी दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे, आपत्कालीन वाहनांना मार्ग कसा द्यायचा याचे प्रात्यक्षिक या मॉडेलद्वारे दिले जाणार आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय तिराणकर, अमरसिंह गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक डॉ. राजकुमार देशमुख, अक्षय जाधव व बाळासाहेब सलगर यांच्या संकल्पनेतून हे मॉडेल अमलात आणले आहे.



## जिजाऊ ज्ञान मंदिर शाळेचे कबड्डी स्पर्धेत सुयश

सुराज्य/उत्तर सोलापूर

युवक संच लनालय पुणे विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूल कोंडी येथील १४ वर्ष वयोगटातील मुलीच्या संघाने रोमहर्षक विजय पटकाविला. हर्षवर्धन प्रशाला तळे हिप्परगा विरुद्ध जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यामध्ये झाला.

हर्षवर्धन प्रशाला, तळे हीप्परगा यांच्यावर तेरा गुणांनी विजय मिळविला. साखळी सामन्यात दुसरा सामना सदगुरू सयाजी महाराज बागडे प्रशाला पाकणी विरुद्ध जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये झाला. जिजाऊच्या खेळाडूंनी दुसरा सामना एकतर्फी जिंकला.१३ गुण घेत जिजाऊचा संघ अंतिम सामना जिजामाता प्रशाला कोंडी आणि जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यामध्ये झाला. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक जिजाऊ इंग्लिशचे स्कूल मधील खेळाडू सिद्धी घडमोडे, प्रज्ञा नीळ, आकांक्षा शिंदे, पूजा शिंदे शिवांजली खंदारे, श्रावणी वाघचवरे, संजना राठोड, वैभवी कुंभार, श्रद्धा जाधव, ऋतुजा दळवी, योगिता श्रावण, प्रतीक्षा लोंढे या खेळाडूंने विजयाची परंपरा कायम राखली असल्याने या संघाचा जिल्हास्तरीय स्पर्धेत निवड झाली. सर्व यशस्वी खेळाडूचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ आणि प्राचार्य सुषमा निळ यांनी अभिनंदन केले आहे. क्रीडा शिक्षक दीपक भोसले यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

## छन्नूसिंह चंदेले यांच्या स्मृतीला अभिवादन

**सोलापूर** : ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. शहर जिल्हा अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते जुना एम्प्लॉयमेट चौक येथील भाई छन्नूसिंह चंदेले स्मृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी स्मृती केंद्राचे अध्यक्ष हेमूजी चंदेले उपाध्यक्ष प्रा. विलास बेत, सचिव रविंद्र मोकाशी, ज्येष्ट पत्रकार अविनाश कुलकर्णी, अनवर सैपन, शफी इनामदार, निलेश गायकवाड, रुस्तुम कंपली, आंबादास गुत्तीकोंडा, माजी नगरसेवक विनोद भोसले, अझम सैपन, अमृतदत्त चिनी, माजी नगरसेवक रमेश कैरमकोंडा, दत्ता सोनवणे, सुधीर चंदेले, राहुल चंदेले, इस्माईल कुरेशी, आदी उपस्थित होते.

## हिंदूंनी संघटित होणे गरजेचे : राजन बुणगे

**अक्कलकोट** : हिंदू राष्ट्राची मागणी संविधानिक आहे ती आम्ही मिळविणारच आहोत त्यासाठी आधी हिंदूंनी संघटित होणे गरजेचे आहे या सभेच्या निमित्ताने सर्वांनी निर्धार करावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक राजन बुणगे यांनी केले या मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला युवक वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती.



अक्कलकोट येथील प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथे झालेल्या हिंदु राष्ट्र-जागृती सभेत राजन बुणगे आणि वास्तववादी मुद्दे मांडले. या सभेला नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, पक्षनेते महेश हिंडोळे, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, अरुण भुजंगे ओमप्रकाश तळेकर, आरती काळे, सुखदा ग्रामोपाध्ये, विणा फंड आदींसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि राजकीय पक्ष यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांसह शहर, तसेच आजूबाजूच्या गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही सभा यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक आनंद खजूरगीकर, तम्मा शेळके, मलम्मा पसारे, संदीप कटकधोंड, मनोज सक्करगी, भीमराव साठे,आतिश कटारे, प्रथमेश पवार, राजेंद्र हुच्चे, सुभाष पुजारी, किशोर जगताप, मनसे अध्यक्ष मल्लिनाथ पाटील आदींनी प्रयत्न केले.सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन वर्षा जेवळे आणि रश्मी चाळके यांनी केले.

# कोळेगाव धरणप्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नी अधिवेशनानंतर मंत्रालयात बैठक लावणार : मंत्री शंभूराजे देसाई

**आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या लक्षवेधीवर सरकारच्यावतीने मंत्री शंभुराज देसाई यांचे उत्तर**

**अकलूज** : आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी करमाळा तालुक्यातील कोळगाव धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतच्या विधानपरिषदेत लक्षवेधी उपस्थित केली असता सरकारच्या वतीने मंत्री शंभुराज देसाई यांनी पुनर्वसितांना पर्यायी जमिनी देण्यासंदर्भात पुनर्वसन कायद्यातील तरतुदी नुसार विहीत ६५% रक्कम कशा व कोणत्या पद्धतीने भरून घ्यायच्या यांच्यासाठी सर्वंकष धोरण ठरवावे लागेल व कोळगाव सारखे अजून किती प्रकल्पग्रस्त लोकांनी पुनर्वसनाची मागणी केलेली आहे.

ज्या त्या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात पुनर्वसनासाठी जमिनी उपलब्ध आहेत का यासाठी अधिवेशन संपल्यानंतर विस्तृत बैठक घेण्याचे व या बाबतीत धोरण ठरवण्यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊ म्हणून आश्वस्त केले. त्याच प्रमाणे सिना कोळगाव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये



जमिनींचे संपादन न केल्यास लाभक्षेत्रातील प्रस्तावित शेतकर्यांच्या जमीनीवरील शेरे पुर्णपणे उठवण्याबाबत सरकारने धोरण ठरण्याची मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केली त्यावेळी मंत्री शंभुराज देसाई यांनी पुनर्वसितांसंबंधी सर्वकष धोरण ठरवुन त्यांच्या समस्यावर मार्ग काढनार असल्याचे सांगितले.

चर्चेवेळेस पंढरपूर तालुक्यातील उजनी प्रकल्पगस्त काही गावे पंढरपूर नगरपरिषदेच्या हद्दीत गेलेली आहेत त्यांना पुनर्वसन अंतर्गत मिळाल्या जाणाऱ्या नागरी सुविधा अजून मिळालेल्या नाहीत तर मंगळवेढा तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांना जमिनींचे वाटप झालेले आहे परंतु त्यांना गावठाण अद्याप ही मिळाले नसल्याचा मुद्दा आ.मोहिते-पाटील यानी सभागृहात उपस्थित केला यावर मंत्री देसाई यांनी संबंधित प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन आराखड्यात त्यांचे पुनर्वसन करण्याचे निश्चित आहे गावठाण देण्याचे निश्चित आहे संबंधित प्रकल्प पुनर्वसनाच्या आरखड्यात ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदीची लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल असे सांगितले. करमाळा तालुका आणि परांडा तालुका लाभक्षेत्र असलेल्या सिना कोळेगाव प्रकल्पास १९९२ साली प्रसासकीय मान्यता देण्यात येऊन १९९४ साली या प्रकल्पाचे प्रत्यक्षात काम सुरु झाले.२००७ साली या धरणाचे काम पुर्ण होऊन पाणी साठवण्यास सुरवात झाली.सिना कोळगाव प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता ५.३१५ द्घवउ इतकी असुन यामुळे करमाळा आणि परांडा तालुक्यातील १३४३५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येनार आहे. यात करमाळा तालुक्याच्या पुर्व भागातील सुमारे ४००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सिना कोळगाव धरणग्रस्तांसंबंधी तत्कालीन पुनर्वसन मंत्री कै पतंगराव कदम यांच्या दालनात बैठक लावून दोन महिन्यात पुनर्वसितांना पर्यायी जमिनी देण्यासंदर्भात पुनवर्सन कायद्यानुसार विहीत ६५% रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले होते तरी अजूनही अमंलबजावणी का झाली नाही याचीही चौकशी करणार असल्याची माहिती मंत्री शंभुराज देसाई यांनी विधानपरिषदेत दिली.

# जिरेनियम शेती अन् नोकरदाराप्रमाणे उत्पन्नाची हमी

## ▶ सूर्यनारायणाच्या चिंचोलीत शेंडगे यांची कमी कष्टाची पण जादा नफ्याची सुगंधी वनस्पती शेती

✔ सुराज्य/शिवाजी हळणवर

शास्त्रज्ञांपेक्षा ही जास्त शेतीत शेतकरी प्रयोग करीत आहेत. अशक्य ते शक्य करून दाखविणारे शेतकऱ्यांचे हात अनेक प्रयोगामुळे बळकट झाले आहेत. त्यामुळेच सोलापूर जिल्ह्यात शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग सुरू आहेत. निसर्गाचा लहरीपणा, पारंपरिक पिकांच्या उत्पादनातील आणि भावातील अनिश्चितता यातून मार्ग काढण्यासाठी प्रयोगशिल शेतकरी नवनव्या पिकांच्या शोधत असतात असाच कमी कष्ट, कमीच खर्च आणि नोकरदारांप्रमाणे उत्पन्नाची हमी असणाऱ्या जिरेनियम लागवडीची अनोखी शेती राज्यातील एकमेव सुर्य नारायण देवाचे हेमाडपंथी मंदिर असलेल्या पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील इंजिनिअर असूनही शेतीची आवड असणाऱ्या अजित दशरथ शेंडगे यांनी ८ एकर क्षेत्रावर जिरेनियमची यशस्वी लागवड करीत तेल निर्मिती प्रकल्पाची उभारणी ही केली आहे.

### शेतकरी ते कंपनी थेट विक्री

अत्तरे, सौंदर्य प्रसाधने यांच्या उत्पादनासाठी जिरेनियमच्या तेलाला मोठी मागणी आहे. सौंदर्य प्रसाधन उद्योगाच्या गरजेपैकी अवघे पाच टक्के जिरेनियम तेलाचे उत्पादन देशात होते. त्यामुळे सौंदर्य प्रसाधनांचा उद्योग प्रामुख्याने आयात तेलावर अवलंबून आहे. केंद्रीय औषधी आणि सुगंधी वनस्पती संस्था (लखनौ) यांच्या अहवालानुसार देशांतर्गत सौंदर्य प्रसाधन उद्योगाची सुगंधी तेलाची गरज सुमारे २५० टनांची आहे. त्यापैकी अवघे दहा टन तेलाचे उत्पादन देशात होते. त्यामुळे भविष्यात जिरेनियम तेलाची मागणी वाढती राहणार आहे. याचा पूर्ण अभ्यास करून सुरुवातीला रोपवाटीकेतून रोपे आणण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील लागवडीसाठी मात्र शेंडगे यांनी स्वत: रोपे तयार केली. जिरेनियमच्या लागवडीनंतर पहिल्या वर्षीच्या पहिल्या छाटणीच्यावेळी कांड्यांपासून रोपे तयार करण्यात आली. जिरेनियम ही वेगवेगळ्या हवामानात वाढणारी बहुवार्षिक, झुडुपवर्गीय सुगंधी वनस्पती आहे. हलक्या ते मध्यम जमिनीत या वनस्पतींची लागवड करण्यात येते. पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत जिरेनियमची वाढ चांगली होते. त्याचबरोबर तेलाचा





उताराही चांगला मिळतो.

एक टन जिरेनियमच्या पानांपासून सुमारे १००० ते १२०० मिलीलिटर सुगंधी तेल मिळते. प्राथमिक अवस्थेतील या तेलाचा वापर प्रामुख्याने अत्तरे, सौंदर्य प्रसाधने, सुवासिक साबण तयार करण्यासाठी होतो. सौंदर्य प्रसाधन कंपन्या १२ हजार ५०० रुपये प्रती किलो दराने हे तेल जागेवरून खरेदी करतात. जिरेनियमची एक एकर क्षेत्रावर लागवड केल्यास खर्च वजा जाता तीन महिन्याला एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. तेल काढल्यानंतर उरलेल्या पानांच्या चोथ्यापासून कंपोस्ट खत तयार करता येते, अथवा चोथ्याचा वापर उदबत्ती तयार करण्यासाठी देखील होतो.

**व्यावसायिक पद्धतीने उत्पादन घ्यावे**

गेल्या काही वर्षांपासून जिरेनियम लागवडीकडे शेतकरी वळले आहेत. जिरेनियमची लागवड करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक या पिकांचा तांत्रिक अभ्यास करावा. पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. माती परीक्षण, आपल्या परिसरातील हवामान, पावसाचे प्रमाण याचा अभ्यास करावा. शुध्द रोपांची निवड, खतांच्या योग्य प्रमाणातील मात्रा, योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पारंपरिक निष्काळजीपणा टाळून व्यावसायिक पध्दतीने उत्पादन घेतल्यास जिरेनियमपासून चांगले उत्पन्न मिळू शकते. तेलाला बाजारपेठ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी अभ्यास करावा. एक, दोन खरेदीदारांवर अवलंबून राहू नये. वेगळे पर्याय शोधावेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ते शक्य आहे.

**- डॉ.विक्रम जांभळे,**
प्रभारी अधिकारी,औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी.

**कमी कष्टाची पण जादा नफ्याची, मध्यस्थ टाळून शेतकरी ते कंपनी थेट विक्री**

जिरेनियम हे कमीत कमी जोखमीचे पीक आहे. नैसर्गिक आपत्तीत जिरेनियमचे फारसे नुकसान होत नाही. ३ फूट बाय सव्वाफुट फूट अंतरावर रोपांची लागवड केली असून एकरी १० हजार रोपे लागली आहेत. एक रोप ५ रुपयांना मिळते. जिरेनियमच्या लागवडीपासून ३ ते ४ महिन्यांत साधारणतः तीन ते चार फूट उंचीपर्यंत वाढ होऊन पाल्याची पहिली कापणी होते. त्यानंतर पुढील प्रत्येक ३ महिन्यांनी कापणी केली जाते. एका एकरात एका कापणीतील पाल्यापासून ९ ते १० किलो सुगंधी तेल मिळते.मुंबई येथील केळकर कंपनीचे प्रतिनिधी जाग्यावर येवून एका किलोला १२ हजार ५०० रुपये भाव तेल खरेदी करतात.शाश्वत भाव मिळतो.

**-अजित शेंडगे,**
जिरेनियम उत्पादक शेतकरी ,नारायण चिंचोली ता.पंढरपूर



## अखिल भारतीय साहित्य परिषदेचे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

✔ **सुराज्य/माढा** : अखिल भारतीय साहित्य परिषदेच्यावतीने दिनकरराव जवळकर राज्यस्तरीय युवा पत्रकाररत्न पुरस्कार राजेंद्रकुमार बाळू गुंड यांना आणि हटकरवाडीचे प्रगतशील द्राक्ष बागायतदार शिवशंकर गवळी यांना बालाघाट राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्कार संमेलनाध्यक्ष तथा इतिहास संशोधक प्रा. शरद गोरे यांच्या हस्ते व राज्याचे माजी दुग्धविकास मंत्री मधुकर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. पत्रकार राजेंद्र गुंड यांनी सन २०१५ पासून पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, कृषी, राजकीय, क्रिडा व आरोग्य क्षेत्रातील पत्रकारितेची दखल घेऊन त्यांना साहित्य परिषदेच्यावतीने स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रगतशील शेतकरी शिवशंकर गवळी यांनी ४० एकर क्षेत्रात द्राक्ष व इतर फळबागांचे मागील अनेक वर्षापासून विक्रमी उत्पादन घेतले आहे. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केले आहेत त्यांच्या या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले आहे.अ. भा. साहित्य परिषदेचे दुसरे बालाघाट मराठी साहित्य संमेलन तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात साहित्यिक व इतिहास संशोधक शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याप्रसंगी माजी मंत्री मधुकर चव्हाण, चेअरमन अनिलकुमार अनभुले, कवी फुलचंद नागटिळक, परमेश्वर पालकर, ज्ञानेश्वर पतंगे, बबन पवार, तानाजी गावडे, विशाल अनुभुले, बालाजी राऊत, किरण गायकवाड यांच्यासह साहित्यिक, कवी, कथाकार, लेखक, शिक्षक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील अधिकारी कर्मचाऱ्यांना मास्क सक्ती

### भाविकांनी मास्कचा वापर करावा - कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे

✔ **सुराज्य/पंढरपूर : पंढरपूराच्या विठ्ठल मंदिरात मास्क सक्ती करण्यात आली आहे ती पण, फक्त कर्मचाऱ्यांची! आंतरराष्ट्रीय स्तरावर कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने विठ्ठल मंदिरातील कर्मचाऱ्यांसाठी मास्क सक्ती करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली आहे.**



कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठीच राज्य सरकारने उपाययोजना सुरू केली आहेत. त्यातच गर्दीच्या ठिकाणी असणारे पंढरपूर येथे सध्या कोरोनाचा एकही रुग्ण नाही मात्र कोरोनाची काळजी लक्षात घेता मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी चर्चा करून मंदिर परिसरात आणि मंदिरातील अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना मास्क वापरणे सक्तीचे केले आहे.

मात्र, मास्क सक्ती भाविकांसाठी करण्यात आली नाही. पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी आवाहन केलं आहे की, 'भाविकांनी मास्कचा वापर करावा. आपली आणि परिवार नातेवाईकांची आरोग्याच्या दृष्टीने काळजी घ्यावी. दर्शनाला येणाऱ्या भाविकांनी मास्क घालून यावा तसेच मंदिर समितीच्यावतीने मंदिराच्या प्रवेशद्वारावर भाविकांसाठी मोफत मास्क पुरवण्यात येणार आहेत.



## प्रताप क्रीडा मंडळाच्या समूहनृत्य स्पर्धेस दिमाखात प्रारंभ

✔ सुराज्य/अकलूज

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळातर्फे आयोजित केलेल्या ४२ व्या शालेय मुला मुलींच्या समूह नृत्य स्पर्धेचा प्रारंभ मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, नटराज पूजन व रंगमंचावर श्रीफळ वाढवून दिमाखात झाला.

यावेळी सहकार महर्षी व रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन स्पर्धेतील बालकलाकारांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, माजी आमदार दत्तात्रय सावंत, तहसीलदार जगदीश निंबाळकर, पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर, ॲड. नितीन खराडे-पाटील, परीक्षक प्रा. पंकज पवार, किरण लोंढे, डॉ. सागर भजनावळे, उपाध्यक्ष प्रताप पाटील, खजिनदार वसंतराव जाधव, सचिव पोपटराव भोसले-पाटील, स्पर्धा प्रमुख संजय गळीतकर, विश्वनाथ आवड, पोपटराव देठे, अमोल फुले मंडळाचे सर्व संचालक प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जयसिंह मोहिते-पाटील म्हणाले, 'मागील ४२ वर्षांपूर्वी स्पर्धेचा ठराविक साचा होता. आज यामध्ये प्रचंड गुणवत्ता वाढली असून शिक्षण प्रसारक मंडळाच्या बाहेरील संघ ही स्पर्धेमध्ये येत आहेत. त्या संघाचा वेगळा गट तयार करून ग्रामीण भागातील शाळांना मंडळांनी अनुदान द्यावे अशी सूचना केली. यावेळी तात्काळ अतिग्रामीण गटातील शाळांना रुपये पाच हजाराचे अनुदान मंडळाचे अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी जाहीर केले.या स्पर्धेमुळे अनेक चित्रपट, टीव्ही कलावंत, नृत्यांगणा, नृत्य दिग्दर्शक, दिग्दर्शक निर्माते म्हणून उदयाला आले. या स्पर्धेत पूर्वी सादर झालेल्या यल्लमा गीताला व लावणी गीताला सोशल मीडियावर सुमारे एक कोटी २० लाख लोकांनी पसंती दिली. सदरच्या स्पर्धा १ ली ते ४थी शहरी व ग्रामीण गट, ५ वी ते ७वी शहरी व ग्रामीण गट, ८वी ते १०वी लोकनृत्य अति ग्रामीण, ग्रामीण व शहरी पाश्चिमात्य नृत्य गट, ५ वी ते १० वी प्रासंगिक शहरी ग्रामीण गट व ११वी ते महाविद्यालयीन थीम डान्स गट अशा पाच गटात होत असून यामध्ये एकूण ९३ संघाच्या गीतातून १२९५ विद्यार्थी कलाकारांनी सहभाग घेतला आहे.

सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, आर. आर. पाटील यांनी केले.

## धनगर समाजातर्फे खा. गावित यांचा निषेध

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

महाराष्ट्रातील धनगरांना एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे अशी मागणी सुरू होती, याबाबत चर्चा सुरू असताना खासदार राजेंद्र गावित यांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण देऊ नये, अशी मागणी करण्यात आली.

कुर्डूवाडी येथे यशवंत सेना व सकल धनगर समाजाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक येथे स. ११ वा. खासदार राजेंद्र गावित यांच्या पोस्टरला चपलांचा हार घालून जोडे मारून तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

यावेळी अभिजित सोलंकर, आप्पासाहेब बोरकर, मयूर खरात, विजय श्रीरामे, धनाजी कोकरे, नंदू देवकाते, किसन हनवते, बाळासाहेब गोफने, फिरोज बागवान, काकासाहेब लेंगरे, बजरंग सलगर, अर्जुन लवटे, विठ्ठल सोलवणे, गणेश सोलवणे, पंडित सोलंकर, दीपक शिंगाडे, अभिजीत सोलंकर, सत्यवान हांडे, आकाश मोरे, सागर तरंगे, बंडू मदने, सचिन शिंदे, प्रशांत खरात,गोटु खोत, अमन सुळ, पवन पाटील, बापू लेंगरे, समर्थ वाघमोडे, दत्ता नरोटे, दीपक शिंदे, विकास मदने, निखिल मदने, अमोल मदने, बबन तरंगे, सद्दाम पटेल, मधुकर शिंदे, स्वरा कोकरे, विनायक गायकवाड आदीसह समाज बांधव उपस्थित होते.

## निवासासाठी केलेले अतिक्रमण नियमित करावे

### नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीसची मागणी

✔ सुराज्य/मोहोळ

ग्रामीण भागात निवासासाठी शासकिय जागेत केलेले अतिक्रमण नियमित करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन मोहोळचे गटविकास अधिकारी नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस या संघटनेच्यावतीने देण्यात आले आहे

ग्रामीण भागात शासकिय जागेत निवासी प्रयोजनासाठी केलेले अतिक्रमण नियमित करण्यासाठी वार्षिक मूल्य दर निश्चित करून अतिक्रमण शुल्क भरून करणेकरिता मोडल सुरु करण्यात आले आहे. गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचा अहवाल घेऊन त्यांच्या स्तरावर जिल्हा अधिकारी यांच्याकडे पाठवून मंजूर करून घ्यावयाचा आहे. गावठान व गायरान वनविभाग यांच्या जमिनीवरील याची नोंद ग्रामपंचायत स्तरावर करण्यात यावी यासाठी शासनाने परिपत्रके काढून कळवले आहे.



## नूतन सरपंच भुजंगराव शिंगाडे यांचा झिंजेवस्ती येथे सत्कार

✔ **सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत थेट जनतेतुन भुजंगराव शिंगाडे हे १९ मतांनी विजयी झाले. याबद्दल झिंजेवस्ती ग्रामस्थ यांच्यावतीने त्यांचा ज्येष्ठ नेते शयामतात्या मदने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका संघटक लहु पाटील, चेअरमन नाथा मदने, राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन कपने, जितेंद्र पाटील, मायापा जावळे, सलीम मुलाणी उपस्थित होते.

## अवैध धंद्यासह चोरटी वाळू वाहतूक होणार नाही : स्वामी

✔ सुराज्य/अक्कलकोट

दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकामी कटिबद्ध असून मैंदर्गी, दुधनी शहरासह तडवळ भागातील अवैध धंद्यासह चोरटी वाळू वाहतूक होणार नाही. कुणी जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचा बिमोड केला जाईल असे दक्षिण पोलिस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी सांगितले.

ते गुरुवारी दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदिप काळे यांची नुकतीच बृन्हमुंबई येथे बदली झाल्याने त्यांची रिक्त जागी पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी पदभार स्विकारला, त्याप्रसंगी ते बोलत होते.

पो. नि. महेश स्वामी म्हणाले, 'श्री स्वामी समर्थांच्या तालुक्यात काम करण्याची संधी मिळाली आहे. गेली १७ वर्षे पोलीस प्रशासन सेवेत कार्यरत असून मूळगाव मुरुड (जि. लातूर) येथील असून पोलीस निरीक्षक म्हणून नागपूर, पुणे शहर ग्रामीण, मिरज ग्रामीण, पिंपरी चिंचवड आणि आता अक्कलकोट येथे कार्य करण्याची संधी मिळालेली आहे. दक्षिण पोलीस ठाण्याची भौगोलिक परिस्थिती मोठी असून हद्दीत २ नगरपालिका



क्षेत्र आहेत. याबरोबर तडवळ भागासह कर्नाटक सिमेलगतची गावे आहेत. हद्दीतील २ शहरासह गाव, वाड्या, वस्त्या, तांड्यापर्यंतच्या पोलीस विभागाच्या अडचणी सोडविणेकामी कटिबद्ध असल्याचे सांगून हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकामी कटिबद्ध असून मैंदर्गी, दुधनी शहरासह तडवळ भागातील अवैध धंद्यासह चोरटी वाळू वाहतूक होणार नाही. कुणी जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचा बिमोड केला जाईल, असे नूतन पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी सांगितले.



## मोहोळ ग्रामीण रुग्णालयात कुपोषित बालकांचे तपासणी व उपचार शिबिर

✔ **सुराज्य/मोहोळ** : जिल्हा शल्य चिकित्सक व मोहोळ ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमअंतर्गत कुपोषित मुलांचे तपासणी व उपचार शिबिर घेण्यात आले. सदर शिबिरात ४३ बालकांनी तपासणी करण्यात आली. मोहोळ शहरातील नामांकित बालरोग तज्ञ डॉ. विश्वजित विभूते, डॉ. पी. पी. गायकवाड, ग्रामीण रुग्णालय मोहोळ यांनी बालकांची तपासणी करून औषधोपचार दिले. सर्व बालकांचे रक्त तपासणी, एक्स-रे व औषधोपचार मोफत करण्यात आले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी डॉ. मुजावर, डॉ. सुरवसे, डॉ. हंजगीकर, औषधनिर्माता सचिन सोनवणे, मंत्री, दळवी तसेच आरोग्य सेविका पाटील, लोंढे, हिरेमठ व सोने. लॅब टेक्निशियन सचिन गायकवाड व एक्स-रे टेक्निशियन तांबे यांनी शिबिराचे कामकाज पाहिले. शिबिरासाठी मोहोळ येथील बालविकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी उपस्थित होते. या शिबिरात १२ बालक तीव्र कुपोषित ११ बालके मध्यम कुपोषित २ बालक इतर आजारांची तर उर्वरित १८ बालके सर्वसाधारण श्रेणीत आढळले. कुपोषित बालकांवर पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे उपचार करण्यात येणार आहेत.


## शायनिंग महाराष्ट्र प्रदर्शनाला दुसऱ्या दिवशी चार हजार नागरिकांची भेट

### ▶ प्रदर्शनाला आलेल्या नवनिर्वाचित सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार

✔ सुराज्य/वेळापूर

येथील शिवशंभू मंगल कार्यालयात दिल्लीच्या सांसा फॉउंडेशनच्यावतीने केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाला दुसऱ्या दिवशी चार हजाराहून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिकांनी भेट दिली. गुरुवारी सुरु झालेल्या या प्रदर्शनाचा शनिवारी दुपारी एक वाजता समारोप होणार आहे.

माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार रणजीतसिंग नाईक-निंबाळकर यांच्या प्रेरणा आणि कल्पनेतून सुरु




झालेल्या शायनिंग महाराष्ट्र २०२२ या प्रदर्शनाने नागरिकांचे चांगले लक्ष वेधले आहे.

दुसऱ्या दिवशी या प्रदर्शनाला वेळापूर परिसरातील हजारो नागरिकांनी हजेरी लावली. अकलूज, माळेवाडी, तांदुळवाडी, पिलीव, माळशिरस आदी भागातील नागरिकांसह पंढरपूरच्या स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयीन तरुणांनी हजेरी लावली.

पानीव येथील श्रीराम शिक्षण संकुलातील एक हजाराहून विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहून आनंद व्यक्त केला. शिक्षण प्रसारक मंडळमधील विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**नवनिर्वाचित सरपंच, सदस्य सत्काराने भारावले**

माळशिरस तालुक्यात नुकत्याच ग्रामपंचायत निवडणुका झाल्या. या निवडणुकात विजयी झालेल्या सरपंच तसेच सदस्यांना केंद्र सरकारच्या योजनांची माहिती व्हावी म्हणून या प्रदर्शनात विशेष निमंत्रित करण्यात आले. याला प्रतिसाद देताना साठ सदस्य आणि पंधरा सरपंचांनी भेट देत सराकारच्या योजना समजून घेतल्या.

या साऱ्यांचा यावेळी सांसा फॉउंडेशनच्यावतीने मनमोहन भास्कर, आनंद पाल आणि अकीला श्रीनिवासन, साक्षी सैनी आणि माळशिरस पंचायत समितीचे माजी सदस्य के. के. पाटील यांच्या हस्ते फेटा बांधून, हार आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# एकाच वेळी लोकसभा, विधानसभा निवडणुकांसाठी पुन्हा चाचपणी

सुराज्य/मुंबई

**देशात कोणत्या ना कोणत्या भागात सतत होणाऱ्या निवडणुकांमुळे देशाच्या व राज्यांच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक भार तसेच राजकीय अस्थिरता दूर करण्यासाठी लोकसभा व सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची चाचपणी केंद्रीय विधी आयोगाने पुन्हा एकदा सुरु केली आहे.**



एकाच वेळी निवडणुका घेतल्यानंतर कोणत्याही एका पक्षाला सरकार स्थापनेसाठी स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर सहमतीने पंतप्रधान किंवा मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करावी, अशी शिफारस करण्यात आली आहे. त्यावर राष्ट्रीय राजकीय पक्ष, केंद्रीय निवडणूक आयोग, नोकरशहा, अभ्यासक व घटनातज्ज्ञ यांची मते जाणून घेण्याचे विधी आयोगाने ठरविले आहे.

केंद्रीय विधी आयोग व निती आयोगाने २५ व २६ नोव्हेंबर २०१७ रोजी विधी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात लोकसभा व विधानसभेच्या एकाच वेळी निवडणुका घेण्याचा विचार करावा, अशी सूचना केली होती. त्यानुसार विधी आयोगाने २०१८ मध्ये एकाच वेळी निवडणुका घेण्याबाबतचा मसुदा अहवाल तयार करुन, त्यावर राजकीय पक्ष, निवडणूक आयोग, घटना तज्ज्ञ, विद्यार्थी, नोकरशहा यांची मते जाणून घेतली होती. देशात १९५१-५२ ते १९६७ पर्यंत लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर काही विधानसभा बरखास्त करण्यात आल्या, तसेच १९७० मध्ये लोकसभाही बरखास्त करण्यात आली होती, त्यामुळे एकाच वेळी निवडणुका घेण्याची प्रक्रिया खंडित झाली, याकडे आयोगाने लक्ष वेधले आहे.

देशात कोणत्या ना कोणत्या भागात सतत निवडणुका होत असतात, त्यावर होणारा खर्च, निवडणूक आचारसिंहेतेचा विकास कामांवर होणारा परिणाम, राजकीय अस्थिरता, ही परिस्थिती बदलायची असेल तर लोकसभा व विधानसभांच्या एकाच वेळी निवडणुका घेणे योग्य ठरेल, असे आयोगाचे मत आहे. त्यातील सर्वात अडचणीचा मुद्दा म्हणजे एकाच वेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका घेतल्यानंतर कोणत्याही एका पक्षाला किंवा निवडणूकपूर्व आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर काय करायचे हा प्रश्न पुढे येतो.

त्यावर लोकसभा वा विधानसभांमध्ये त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली तर, पुन्हा निवडणुकांना सामोरे जाण्याऐवजी सहमतीने पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांची निवड किंवा नियुक्ती करावी, अशी शिफारस आयोगाने केली आहे. त्यासाठी घटनेच्या दहाव्या सूचिमध्ये दुरुस्ती करावी लागणार आहे. एखाद्या पक्षाने काढलेल्या पक्षादेशाच्या विरोधात जाऊन एखाद्या सदस्याने मतदान केले तर, पक्षांतरबंदी कायद्यानुसार तो सदस्य अपात्र ठरतो, ही तरतूद रद्द करण्यासाठी दहाव्या सूचीमध्ये त्याचबरोबर काही कायद्यांमध्येही सुधारणा कराव्या लागणार आहेत.

## सिक्कीममध्ये लष्कराची बस दरीत कोसळली

### १६ भारतीय जवानांचा वीरमरण



सुराज्य/सिक्कीम

सिक्कीममध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. उत्तर सिक्कीममध्ये लष्कराचे वाहन दरीत कोसळल्याने १६ जवानांचा मृत्यू झाला आहे. तर, या घटनेत चार जवान जखमी झाले आहे. घटनास्थळावर स्थानिक पोलीस आणि लष्कराकडून बचावकार्य सुरु करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळच्या सुमारास लष्कराच्या तीन गाड्या जवानांना घेऊन चट्टेनहून थांगूच्या दिशेने निघाले होते. झेमा येथे वळणावर मोठा उतारा होता. तेव्हा चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने जवानांची बस दरीत कोसळली. या दुर्घटनेत १६ जवानांचा मृत्यू झाला आहे.

ही घटना घडल्यानंतर स्थानिक पोलिसांकडून तत्काळ बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. दरीत कोसळलेल्या ४ जखमी जवानांना हेलिकॉप्टरच्या माध्यमातून बाहेर काढण्यात आलं. या घटनेत तीन कनिष्ठ अधिकारी आणि १३ जवानांचा मृत्यू झाला आहे, असे भारतीय लष्कराकडून निवेदन जारी करत सांगितले आहे.

या दुर्घटनेनंतर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी ट्वीट करत शोक व्यक्त केला आहे. उत्तर सिक्कीममध्ये झालेल्या रस्ते अपघातात लष्कराच्या निधनामुळे दु:ख झाले आहे. त्यांच्या सेवेबद्दल आणि वचनबद्धतेबद्दल देश मनापासून कृतज्ञ आहे. शोकग्रस्त कुटुंबीयाप्रती माझ्या संवेदना आहेत. जखमी जवान लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना करतो, असे राजनाथसिंह म्हणाले.

## राज यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

### बंद दाराआड झालेल्या बैठकीमुळे चर्चांना उधाण

सुराज्य/नागपूर



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे सध्या नागपूर दौऱ्यावर आहेत. नागपुरात त्यांनी मनसेची कार्यकारिणी स्थापन केली. पदाधिकाऱ्यांनी नियुक्तीपत्रे दिल्यानंतर राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. दोन्ही नेत्यांची मुख्यमंत्री दालनात भेट झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पुष्पगुच्छ देऊन राज ठाकरे यांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान, दोन्ही नेत्यांनी बंद दाराआड काही वेळ चर्चाही केली.

संबंधित नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली? याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही. पण मागील काही दिवसांत राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी अनेकदा एकमेकांची भेट घेतली आहे. आता पुन्हा नागपुरात ही भेट झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

या भेटीनंतर आगामी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन समीकरणं पाहायला मिळणार का? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## कोरोना प्रतिबंधक लसीचा बूस्टर डोस आता नाकाद्वारे मिळणार

सुराज्य/नवी दिल्ली

**कोरोनाचा हाहाकार काय असतो ते देशाने आणि जगाने पाहिले आहे. भारतातही कोरोनाच्या तीन लाटा येऊन गेल्या. आता आपण कोरोनाच्या चौथ्या लाटेच्या उंबरठ्यावर उभे आहोत. कारण चीन, जपान या देशांमध्ये कोरोनाचे रूग्ण पुन्हा वाढत आहेत. BF7 हा कोरोनाचा नवा व्हायरंट धोकादायक असल्याची चर्चा आहे. अशात नाकावाटे लस घेता येणेही आता शक्य होणार आहे. यासाठी रूग्णालयांनी मॉक ड्रिल अर्थात सराव सुरू केला आहे.**



भारत बायोटेकने आता नाकाद्वारे देता येणारी कोरोना प्रतिबंधक लस आणली आहे. या लसीच्या वापराला केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने संमती दिली आहे. १८ वर्षे आणि त्यावरील वयाच्या नागरिकांना बूस्टर डोस म्हणून ही लसही घेता येणार आहे.

ज्या नागरिकांनी कोरोनाला प्रतिबंध करणारी कोव्हॅक्सिन किंवा कोव्हिशिल्ड ही लस घेतली आहे त्यांनाही नाकाद्वारे देण्यात येणारी लस बूस्टर म्हणून घेता येणार आहे.

**नाकावाटे असणारी कोरोना प्रतिबंधक लस कशी आहे?**

नाकावाटे देण्यात येणारी कोरोना प्रतिबंधक लस ही सुई नसलेली आहे.

ही लस सध्या खासगी केंद्रांवर उपलब्ध आहे. शुक्रवारी संध्याकाळपर्यंत ही कोविन या पोर्टलवरही उपलब्ध होईल. नाकावाटे देण्यात आलेली ही लस BBV154 किंवा iNCOVCC या लसीला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे.

नोव्हेंबर महिन्यात या लसीच्या तातडीच्या वापरला संमती दिली गेली आहे.

### कोरोनाला तोंड देण्यासाठी काय तयारी आहे?

कोरोना अद्याप संपलेला नाही. ख्रिसमस साजरा व्हायला कार्यालयांमध्ये सुरूवात झाली आहे.

नाताळ साजरा करत असताना कोरोना वाढणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केले आहे. कोव्हिड प्रोटोकॉल पाळत त्याप्रमाणेच वागण्याचे आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केले आहे.

## दोन नक्षलवाद्यांचा गडचिरोलीत खात्मा

सुराज्य/गडचिरोली : दक्षिण गडचिरोली परिसराला लागून असलेल्या छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील जंगलात शुक्रवारी सकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकित दोन नक्षलवादी ठार झाले. मृतांमध्ये नक्षल्यांच्या विभागीय समितीची सदस्य असलेल्या एका महिलेचाही समावेश आहे. अहेरी तालुक्यातील दामरंचा गावापलीकडे छत्तीसगड राज्याची सीमा प्रारंभ होते. त्या परिसरात नक्षल्यांच्या हालचाली सुरु असल्याची माहिती मिळाल्यानंतर गडचिरोली पोलीस दलाच्या सी-६० पथकाचे जवान आणि छत्तीसगडच्या बिजापूर पोलिसांनी त्या भागात नक्षलविरोधी अभियान राबवले. पोलीस दिसताच नक्षल्यांनी गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. यात दोन नक्षलवादी ठार झाले.

## पुण्यात मित्राचा काटा काढला

सुराज्य/पुणे : पुण्यातील खुनाचे सत्र काही थांबण्याचे नाव घेत नाही. कोथरूडमध्ये देखील अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात कारणावरून तरुणाचा खून करण्यात आला. त्यानंतर त्याचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला लटकवून आत्महत्या भासवण्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी कोथरूड पोलिसांनी एकाला अटक केली आहे. विशेष म्हणजे आरोपी हा मयत तरुणाचा मित्रच असल्याचे समोर आले आहे.

## जखमी बिबट्याचा तीन तरुणांवर हल्ला

सुराज्य/जुन्नर : कल्याण नगर महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या बिबट्याने तीन तरूणांवर हल्ला केला असून, एक तरूण जखमी झाला आहे. अपघातामुळे महामार्गावर जखमी अवस्थेत असलेल्या या बिबट्याला पाहण्यासाठी काही तरूण घटनास्थळी गेले होते. त्यातील तिघांवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना बुधवारी सकाळी घडली. भारत कुंडलिक पारधी (वय ३६) हा तरुण घटनेमध्ये जखमी झाला असून, त्याला ओतूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## बेड फुल, रुग्ण जमिनीवर; डॉक्टरही बेशुद्ध होऊन कोसळले

### चीनमध्ये कोरोनाचा कहर

सुराज्य/बीजिंग : **चीनमध्ये पुन्हा एकदा कोरोना विषाणूने धुमाकूळ घातला आहे. रुग्णांची संख्या झपाट्याने वाढल्याने वैद्यकीय यंत्रणा कमी पडू लागली आहे.**

रुग्णालयाच्या आत आणि बाहेर रुग्णांच्या रांगा लागल्या आहेत. चीनमधील भयानक परिस्थितीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. चीनच्या चोंगकिंग शहरातील रुग्णालयातील फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.



चोंगकिंगमधील रुग्णालयात भीषण परिस्थिती आहे. रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागात रुग्ण फरशीवर झोपले आहेत. सर्व बेडवर रुग्ण असल्याने अनेकांना खाली झोपावे लागले आहे. फरशीवर झोपलेल्या रुग्णांना डॉक्टर सीपीआर देत आहेत. रुग्ण व्हेंटिलेटर असल्याचे आणि डॉक्टर शक्य होईल तितके उपचार त्यांच्यावर करत असल्याचे चित्र व्हिडिओत दिसत आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेलाही ७० कोटींचा भुर्दंड?

### सांडपाणी नदीत सोडल्याबद्दल दंड

सुराज्य/पुणे : सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्यात येत असल्याबद्दल पुणे महापालिकेबरोबर पिंपरी-चिंचवड महापालिकेलाही सांडपाणी नदीत सोडल्याप्रकरणी दंड आकारण्यास जलसंपदा विभागाने सुरूवात केली आहे.

वाढलेली पाणीपट्टी आणि रसायनमिश्रित सांडपाणी थेट नदीत सोडल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेला सुमारे ६० ते ७० कोटी रुपयांचा भुर्दंड पडणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणीवाटपाच्या



आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प स्थापित केला नसल्यास किंवा पूर्ण क्षमतेने सुरू नसल्यास मंजूर पाणीकोटा किंवा प्रत्यक्ष पाणीवापर यापैकी जे अधिक असेल त्याच्या दुप्पट दंड आकारणी केली जाणार आहे. त्यानुसार पुण्यापाठोपाठ पिंपरी-चिंचवड महापालिकेला जलसंपदा विभागाकडून दंड आकारणी सुरू करण्यात आली आहे.

## लहानशा झोपडीतून सुरु झाली समाजसेवा

सुराज्य/गडचिरोली

भामरागड राज्यातला सर्वाधिक मागास आणि सतत माओवाद्यांच्या कारवायाने चर्चेत असलेला अतिसंवेदनशील अतिदुर्गम असा तालुका आहे. ४९ वर्षांपूर्वी या भामरागड तालुक्याला जाण्यासाठी रस्ताही नव्हता. वीज या भागातल्या आदिवासींसाठी एक स्वप्न होतं. तर आरोग्याच्या कुठल्याही सोयी या भागातील आदिवासींना उपलब्ध नव्हत्या. साध्या तापाची गोळी सुद्धा मिळत नव्हती. अशा खडतर अवस्थेत जीवन जगणाऱ्या आदिवासींना शिक्षण हे स्वप्न होतं. अशा भागात सेवा करण्याचा निर्धार मनाशी घेऊन बाबा आमटे यांनी ४९ वर्षांपूर्वी भामरागड गाठलं. बाबांच्या सोबत त्यांचे लहान चिरंजीव डॉ प्रकाश आमटे आणि डॉक्टर मंदाकिनी आमटे होते. आमटे दांपत्य वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून नागपूर, पुणे, मुंबईसारख्या शहरात वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातून लाखो रुपये



कमाई करण्याची संधी समोर असतानाही हे दाम्पत्य बाबांसोबत हेमलकसात पोहोचले.

### १९७३ मध्ये एका झोपडीतून लोकबिरादरी प्रकल्प सुरू

चारही बाजूंनी घनदाट जंगल, वन्यप्राण्यांचं वास्तव्य, वीजपुरवठा नाही, पिण्याचं शुद्ध पाणी नाही, आदिवासींची संवाद साधण्यासाठी त्यांची मातृभाषाही अवगत नाही, अशा अवस्थेत बाबांच्या उपस्थितीत १९७३ मध्ये एका झोपडीत लोकबिरादरी प्रकल्प सुरू करण्यात आला. हा लोकबिरादरी प्रकल्प एका लहानशा रोपट्याच्या माध्यमातून सुरू होऊन आज वटवृक्षामध्ये परिवर्तित झाला आहे. त्या काळात आदिवासी नागरिकांशी संवाद साधण्यासाठी डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांना खूप कठीण परिश्रम घ्यावे लागले. मात्र, त्यांनी माडीया आणि गोंडी या दोन्ही भाषा आत्मसात करुन आदिवासींचा विश्वास संपादन केला.

### तिसरी पिढीही लोक बिरादरी प्रकल्पात सेवाव्रत

### लोकबिरादरीची ४९ वर्षे

या भागात आदिवासींना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. त्या सोयी लोकबिरादरी प्रकल्पाच्या आश्रम शाळेतून मिळू लागल्या. या आश्रम शाळेतून शिकून अनेक आदिवासी मुले पोलीस, डॉक्टर, अभियंते, ग्रामसेवक, पटवारी शिक्षक या पदावर पोहचली हे विशेष. डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी यांच्यासोबत आता तिसरी पिढीही लोक बिरादरी प्रकल्पात सेवाव्रत झाली आहे. यामध्ये डॉ. दिगंत आमटे आणि त्यांची मोठी सून अनघा व्यवसायाने डॉक्टर आहे. दिगंत आणि अनघा आमटे या दोघांमुळे उपचाराच्या माध्यमातून येथील आदिवासींना नवे जीवन मिळत आहे. लोकबिरादरी प्रकल्पाने शाळेसोबतच या भागातल्या आदिवासींना सिंचनाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजीतून धडे

अनिकेत आमटे आणि समीक्षा आमटे या दोघांच्या नेतृत्वात शैक्षणिक कार्यासह या भागातल्या आदिवासींच्या जीवनाला दिशा देणारी सिंचनाची क्रांतीही केली. लोकबिरादरी प्रकल्पाचे हे रुग्णालय आता सुसज्ज अशा रुग्णालयांमध्ये परावर्तित झाले आहे. तर, नेलगुंडा आणि जिंजगावसारख्या अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागात साधना विद्यालयातून येथील आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजीतून धडे मिळू लागले.

### २३ डिसेंबरपासून आमटे आठवडा साजरा होणार

२३ डिसेंबरला लोकबिरादरी प्रकल्पाच्या वर्धापन दिन असतो तर २४ डिसेंबरला डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या लग्नाचा वाढदिवस आहे. २५ डिसेंबरला डॉक्टर मंदाकिनी आमटे यांचा वाढदिवस आहे. तर २६ डिसेंबरला डॉ. प्रकाश आमटे यांचा वाढदिवस आणि कर्मयोगी डॉ. बाबा आमटे यांची जयंती आहे. यानिमित्ताने प्रकल्पात विविध कार्यक्रम होणार आहे.

## महाराष्ट्र एकीकरण समितीचे लढवय्ये ॲड. राम आपटे यांचे निधन

सुराज्य/कोल्हापूर : बेळगावातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, महाराष्ट्र एकीकरण समितीचे लढवय्ये नेते, नामवंत वकील व समाजवादी कार्यकर्ते ॲड. राम आपटे यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले. ते ९७ वर्षांचे होते. सीमा चळवळीतील अग्रणी लढवय्या, सच्चा कार्यकर्ता हरपला अशी भावना व्यक्त होत आहे.



त्यांनी आपली संपूर्ण हयात सीमा प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी खर्ची घातली. सीमा प्रश्नाचा संपूर्ण इतिहास मांडणारे इंग्रजी भाषेतील पुस्तक त्यांनी लिहिले होते. सध्याच्या परिस्थितीत प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी या पुस्तकाची मोलाची मदत होणार आहे. त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून व्यापक कार्य केले होते. कामगारांचे प्रश्न सोडवणुकीसाठी त्यांनी अखंड लढा दिला होता. त्यामुळे ते कामगार नेते म्हणूनही परिचित होते. त्यांच्या निधनामुळ बेळगावातील सीमा बांधवांचा सच्चा कैवारी हरपला आहे.

सुप्रीम कोर्टात, महाराष्ट्र एकीकरण समितीच्या न्यायालयीन कामकाजाचे ते समन्वयक होते. तळागाळातील लोकांची सेवा करण्यासाठी, स्वत:ची जमा पुंजी रु. ५० लाख दान करून त्यांनी 'जीवनविवेक प्रतिष्ठान' ही सामाजिक विश्वस्त संस्था स्थापन केली. अन्याय निवारण मंच, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, शोषण मुक्ती दल, जीवन शिक्षण प्रतिष्ठान अशा बेळगावातील अनेक सामाजिक संस्थांचे ते संस्थापक व आधारस्तंभ होते. राम आपटे यांचे मरणोत्तर देहदान करण्यात आले.

# जानेवारीपासून पुन्हा मिळकत कर वसुली सुरू करणार

## ▸ पालिकेकडून आता ५० हजारांपुढील थकबाकीदारांना नोटिसा ▸ अभय योजनेत झाली ४० कोटींची वसुली

✔ सुराज्य/सोलापूर

**महापालिका प्रशासनाच्या वतीने सध्या बंद असलेली मिळकतकर वसुली जानेवारीपासून पुन्हा राबविण्यात येणार आहे. सध्या एक लाखावरील थकबाकीदारांच्या मिळकती जप्ती संदर्भात तसेच ५० हजारांवरील मिळकत कर थकबाकीदारांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.**

सोलापूर महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून यापूर्वी मिळकत कर शास्तीमध्ये ८० टक्के सवलतीची अभय योजना जाहीर करण्यात आली होती. त्याची मुदत आता संपली आहे. यापुढे आता कुणालाही अभय योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आता थेट जानेवारीपासून मिळकत कराची वसुली मोहीम तीव्र करण्यात येणार आहे. अभय योजनेअंतर्गत महिनाभरात एकूण ४० कोटी रुपये मिळकत कर वसुली झाली आहे. त्यापैकी शासकीय मध्ये ८० टक्के सवलत माफी अंतर्गत ९ कोटी रुपये सवलत देण्यात आली आहे.

एक लाखावर मिळकतकर थकबाकी असलेल्यांना यापूर्वीच जप्तीच्या नोटीसा दिल्या आहेत. त्यांच्यावरही आता कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, यापुढे ५० हजारावरील थकबाकी असलेल्या सुमारे ९ हजार मिळकतदारांना नोटीस वाटपाचे काम सुरू आहे. त्यानंतर ही



कार्यवाही मोहीम हाती घेण्यात येणार आहे. धडक वसुली दरम्यान ज्यांनी ज्यांनी धनदेश देऊन सील कारवाई टाळली होती त्या सर्व मिळकतदारांचे धनादेश वटले आहेत. ज्यांच्या मिळकतींना सील लावण्यात आले आहे, त्यांनी कर थकबाकी पूर्ण भरल्याशिवाय ते सील कोणत्याही स्थितीत काढण्यात येणार नसल्याचेही पालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी स्पष्ट केले आहे. सध्या शहरातील मेजर व मिनी गाळे यांच्याकडून वसुली सुरूच आहे. यापुढे व्यवसायिक आस्थापना असलेल्या थकबाकीदारांवर धडक कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये मंगल कार्यालय, मोठी दुकान, थिएटर, शॉपिंग सेंटर, मॉल आदींचा समावेश राहणार आहे.

### ... तर ना हरकत पत्र मिळणार नाही

मिळकती संदर्भात नावात बदल, दुरुस्ती, हस्तांतरण या बाबी करण्यासाठी संबंधितांनी मिळकत कर पूर्णपणे भरणे गरजेचे आहे. ज्यांची थकबाकी आहे त्यांना जोपर्यंत पूर्ण थकबाकी भरत नाहीत तोपर्यंत कोणताही बदल केला जाणार नाही किंवा ना हरकत पत्रही दिले जाणार नसल्याचे उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

### सुनावणीच्या दुरूस्तीचे काम झाल्यावर कर वसुली सुरू होईल : पोळ



सध्या सुनावणीनंतर निकाल झाले आहेत त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. त्यामुळे करवसुली थांबवण्यात आली आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हे दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करण्यात येणार आहे. प्राप्त हरकतीवर सुनावणी अंती टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे. अशी एकूण १८७ कोटी रुपये थकबाकी आहे. दुरुस्तीनंतर ती टप्प्याटप्प्याने महापालिका तिजोरीत जमा होणार असल्याचे पालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

---

## मंगळवेढ्यात व्यापाऱ्याचे घरफोडून दागिने लंपास

✔ सुराज्य/मंगळवेढा

कर्नाटक राज्यात यल्लाम्मा देवींच्या यात्रेला गेल्याचे पाहून चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून लोखंडी कपाटात ठेवलेले ३ लाखाच्या सोन्यांच्या दागिन्यावर डल्ला मारण्याचा प्रकार मंगळवेढा शहरात घडला. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सचिन चेळेकर हे व्यापारी असून शहरातील मध्यवस्तीत रहावयास आहेत.ते त्यांची पत्नी मनिषा,मुलगी अमृता, मुलगा कन्हैय्या यांना घेवून दि.१८ रोजी सकाळी ८.३० वा. ते कोकटनूर (ता.अथणी जि.बेळगाव) येथील यल्लाम्मा देवींच्या यात्रेला गेले होते.यात्रा करून हे कुटुंबिय दि.२१ च्या सायंकाळी घरी आले असता घराच्या दरवाजाचे कुलूप तुटून दरवाजा उघडा दिसला पत्नी मनिषाने आरडाओरडा केल्याने सचिन यांनी घरात जावून पाहिले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. तसेच खोलीतील लोखंडी कपाट उघडून त्यातील सोन्याचे दागिने, १ लाख ६० हजार रुपये किमतीच्या ४ पिळयाच्या १ तोळा वजनाच्या अंगठया,४० हजार रुपये किमतीचे एक तोळा वजनाचे गंठण, ३० हजार रुपये किमतीचे २ तोळा वजनाचे लक्ष्मीहार, २० हजार रुपये किमतीचे अर्धा तोळा वजनाचे सोन्याचे झुबे व स्टॉप्स असा एकूण ३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## पिसेवाडीत जय वाघजाई ग्रामविकास पॅनलने सत्ता राखली

✔ सुराज्य/वेळापूर



पिसेवाडी (तालुका माळशिरस) येथील ग्रामपंचायत निवडणुकीत शिवामृत दूध संघाचे संचालक व माजी सरपंच सुरेश पिसे, सहकार महर्षी कारखान्याचे माजी संचालक महादेव भाकरे व माजी सरपंच अण्णासाहेब शेंडे यांच्या संयुक्त जय वाघजाई ग्रामविकास पॅनेलने सरपंच पदासहित ११ पैकी ६ जागा जिंकून पिसेवाडी ग्रामपंचायत सत्ता कायम ठेवली आहे.

पिसेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जय वाघजाई ग्राम विकास पॅनल, गुरुदत्त ग्रामविकास पॅनल, सिद्धनाथ ग्रामविकास पॅनल याच्यामध्ये तिरंगी लढत होऊन यामध्ये जय वाघजाई ग्रामविकास पॅनल चे सरपंचपदी मोहन भाकरे विजय झाले व या पॅनल मधून भाऊसाहेब पिसे, सुवर्णा राऊत, रुक्मिणी पिसे, पुष्पा पिसे, धनाजी साठे, मोनिका सुळे हे उमेदवार विजयी झाले आहेत. तर विरोधी पॅनल मधून कोमल पवार, रमेश पवार, संगीता काळे, नागेश जानकर, साहिल आतार हे उमेदवार विजयी झाले आहेत. निवडणुकीत जय वाघजाई ग्रामविकास पॅनलच्या विजयाची वार्ता पिसेवाडी येथे कळताच वाघजाई ग्रामविकास पॅनलच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी केली व विजयी उमेदवारांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. यावेळी नूतन सरपंच मोहन भाकरे व नूतन सहा सदस्य यांचा सुरेश पिसे व महादेव भाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अशोक भाकरे, भीमराव काळे, संजय पवार, मल्हारी म्हेत्रे, दीपक पिसे, दादा पिसे, सुखदेव पिसे, उमेश पवार, खंडू मेहत्रे, छगन खरात, कैलास पोरे, विजय बनकर, अमोल राऊत, दादासाहेब शिंदे, वसंत पिसे, विशाल बोराटे, महेश भानवसे, विष्णू पिसे, केशव घाडगे, अतुल पिसे, अब्बासो गुंडा पिसे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरातून अज्ञात चोरट्यांनी पळविल्या चार दुचाकी

✔ सुराज्य/सोलापूर



शहरात दिवसेंदिवस दुचाकी चोरींच्या घटनेत वाढ होत असून, अज्ञात चोरट्यांनी चार दुचाकी चोरून नेल्याची घटना उघडकीस आल्या आहे. पहिली घटन सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संगमेश्वर कॉलेज पार्किंगमध्ये घडली. महेशकुमार सायबण्णा गायकवाड (वय-२०, रा. मुपो. नागोरे, मैंदर्गी) यांची दुचाकी लंपास करण्यात आली.

तपास पोलीस नाईक सरतापे हे करीत आहेत. दुसरी घटना ही सिव्हिल हॉस्पिटल येथील पार्किंगमध्ये दि.२२ डिसेंबर रोजी घडली. अमोल गोरख साळुंखे (वय-२६, रा.मु.पो. कासारवाडी ता.बार्शी) यांची दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे. तपास पोह.नदाफ करीत आहेत. तिसरी घटना ही विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विजापूर नाका झोपडपट्टी नंबर १ नुराणी मस्जिद येथे घडली. फिर्यादी दाऊद रमजान हाजाने यांची दुचाकी चोरीला गेली. तपास पोह.गवळी हे करीत आहेत. चौथी घटना ही विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दावत चौक येथे घडली. फिर्यादी शशिकांत चंदनशिवे (वय-२८, रा.सिद्धार्थ हाऊसिंग सोसायटी) यांची दुचाकी चोरट्याने पळवली. पुढील तपास पोह.शिर्के हे करीत आहेत.

---

## मंद्रूपचे मठाधीपती श्री रेणुक शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी लिंगैक्य...

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

### आज होणार अत्यसंस्कार



मंद्रूप येथील मठाचे मठाधिपती ष.ब्र.श्री. रेणुक शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी (वय ६५) यांचे शुक्रवारी सकाळी सव्वा दहा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने उपचारादरम्यान लिंगैक्य झाले आहे. त्यामुळे त्यांच्या भक्तांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

शनिवारी दुपारी एक वाजता मंद्रूप मठापासून त्यांची अत्यंशोभा यात्रा निघणार असून दुपारी तीन वाजता पंचपीठाच्या जगदगुरू आणि विविध शिवाचार्य महास्वामीजी तसेच भक्त गणांच्या उपस्थितीत अत्यंसंस्कार करण्यात येणार आहे. शुक्रवारी,सकाळी नेहमीप्रमाणे महास्वामीजी पूजेसाठी बसत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि ते खाली कोसळले. यावेळी त्यांचे बंधू संगमनाथ हिरेमठ आणि इतर भक्तांनी त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या खासगी रुग्णालयात हलविले.यावेळी उपचारादरम्यानच रेणुक शिवाचार्य महास्वामीजी हे लिंगैक्य झाले.

महास्वामीजी यांचा जन्म इरय्या गुरूसिध्दय्या हिरेमठ व माता संगव्वाबाई इरय्या हिरेमठ यांच्या पोटी मंद्रूप येथे जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मंद्रूप येथील जिल्हा परिषद शाळेत तसेच माध्यमिक शिक्षण येथीलच लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात झाले होते.

त्यांचे धार्मिक शिक्षण गदग, व्हनाळी आणि हावेरी येथील धार्मिक पाठशाळेत झाले होते. मंद्रूपचे तत्कालीन मठाधिपती ष.ब्र.श्री.वीरपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी यांच्या लिंगैक्यानंतर तब्बल साठ वर्षानंतर १९८४ साली मंद्रूप मठाचे बारावे उत्तराधिकारी म्हणून श्री.रेणूक शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड झाली होती.

### निरंजन हिरेमठ नवे उत्तराधिकारी....

श्री.रेणूक शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे नातू म्हणजे पुतणे गंगाधर व मीनाक्षी हिरेमठ यांचे ज्येष्ठ सुपुत्र निरंजन गंगाधर हिरेमठ यांची निवड करून काशी जगद्गुरू श्री.श्री. श्री.१००८ मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते कृपावस्त्र घालून त्यांना शुभाशीवार्द दिले. यावेळी खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजी, माळकवठेचे मठाधिपती श्री.पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी, नागणसूरचे मठाधिपती श्री. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी,मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य महास्वामीजी, हत्ताळीचे मठाधिपती श्री.पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी, तद्देवाडीचे महांतेश हिरेमठ, सोलापूरचे कल्लय्या शास्त्री गणेचारी, शिवयोगी शास्त्री-होळ्ळीमठ माजी सभापती गुरूसिद्ध म्हेत्रे, मळसिध्द मुगळे, गौरीशंकर मेंडगुदले, सिध्दय्या स्वामी-हिरेमठ, केदार उंबरजे,महादेव कोगनुरे, मुत्या वाडकर, सातप्पा जोडमोटे, रेवणसिध्द जोडमोटे, एडवोकेट नागेश मेंडगुदले,चंद्रशेखर हिरेमठसह भक्तगण उपस्थित होते.

## डीपीसीचा निधी मार्चअखेर खर्च करा : जिल्हाधिकारी

### निवडणुकीच्या आचारसंहितेचा फटका नको

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मिळालेला निधी यंत्रणांनी गांभीर्याने व विहित वेळेत खर्च करावा. त्यासाठी मान्यता व अन्य कार्यवाही प्राधान्याने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिले. लवकरच महानगर पालिका आणि जिल्हा परिषद निवडणूका होणार आहे.

तरी या निधीला आचारसंहितेचा फटका बसणार नाही यांची दक्षात घेण्याचे सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ बाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे आढावा घेण्यात आला. यावेळी पोलीस आयुक्त शिरीष सरदेशपांडे, प्रभारी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ च्या कार्यान्वयनास झालेला विलंब, लवकरच होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमुळे जिल्ह्यात लागणारी आचारसंहिता इत्यादींचा विचार करता मार्च २०२३ अखेरपर्यंत निधी खर्च करण्यासाठी कमी कालावधी मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर या बैठकीत यंत्रणास्तरावर निधी खर्च करण्याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच, यापूर्वी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित मुद्यांचे कार्यपालन अहवालांबाबत आढावा घेण्यात आला. याबरोबरच, जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२३-२४ करिता प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

## विवाहितेचा छळ; चौघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : कर्ज फेडण्याकरिता माहेरून १० लाख रुपये घेऊन ये, त्याशिवाय तु नांदविण्यास येऊ नको आणि तर तुला आम्ही नांदू देणार नाही.तुला घटस्फोट देणार आहोत. असे म्हणून विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघांच्या विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पिडीत विवाहित महिला नेहा विनित चिंतल (वय-२५,रा.रामदास वंगा वाडा, भवानी पेठ, सोलापूर) यांचा विनित चिंतल यांच्याबरोबर २०१६ रोजी विवाह झाला होता. लग्नानंतर फिर्यादीस एक वर्ष व्यवस्थित नांदवले. त्यानंतर मात्र पती विनीत प्रकाश चिंतल, सासू निर्मला प्रकाश चिंतल, दीर ललित प्रकाश चिंतल, जाऊ प्राची ललित चिंतल (रा.सर्वजण राधेय सोसायटी, कात्रज पुणे) यांनी जाचहाट केल्याची तक्रार विवाहितेने दिली. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नाईकवाडी हे करत आहेत.

## शेवगा लागवड योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

✔ **सोलापूर** : जिल्हा पशुसंवर्धन विभागांतर्गत एकूण ११ तालुक्यातून १० गुंठे-आर क्षेत्र किंवा १० आरच्या पटीत क्षेत्राकरिता राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत वैरणीकरिता शेवगा लागवड करणे (अनुसुचित जाती उपयोजना) राबविण्यात येत आहे.

इच्छुक पशुपालक, शेतकरी यांनी ८ जानेवारी २०२३ पर्यंत आपले अर्ज भरुन द्यावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. भास्कर परांडे यांनी केले आहे. योजनेंतर्गत प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा १० गुंठे आर क्षेत्र किंवा १० आरच्या पटीत, प्रती १० गुंठे ७५० ग्रॅम शेवगा अनुदान रु.३००० दिले जाणार आहे. तसेच प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा कमीत कमी व अधिकतम एक हेक्टर असून, प्रती हेक्टर ७.५ किलो शेवगा (पीकेएम-१) यास अनुदान रु.२३,२५० - हे दोन टप्प्यांमध्ये वितरीत करण्यात येणार आहे. योजनेकरिता इच्छुकांनी संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती आणि नजीकचा पशुवैद्यकीय दवाखाना यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## सिद्धेश्वर यात्रेत महापालिकेकडून कोविडविषयक सुविधा; मनपात झाली बैठक

✔ सुराज्य/सोलापूर

कोरोना आपत्तीमुळे गत दोन वर्षे ग्रामदैवत सिध्देश्वरांची यात्रा झाली नव्हती. यंदा ती होणार असल्याने महापालिका प्रशासनाकडून आवश्यक सुविधा दिल्या जाणार आहेत, मात्र कोरोनाच्या नवीन व्हेरएंटच्या पार्श्वभूमीवर यात्रेच्या ठिकाणी आवश्यक खबरदारी घेण्यात येणार आहेत.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी शुक्रवारी यात्रेच्या पूर्वतयारीसंदर्भात



प्रशासकिय बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, उपायुक्त विद्या पोळ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांनी यात्रेसंदर्भात महापालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत चर्चा केली तसेच केलेल्या कामांचा आढावा घेतला. पाणी, रस्ते, ड्रेनेज, दिवाबत्ती, स्वच्छता आदी सुविधा देण्याबाबत संबंधित विभागांनी कार्यवाही करावी, अशा सूचना आयुक्तांनी केल्या तसेच कोरोनाबाबत आवश्यक खबरदारी घेऊन संबंधित सुविधांची सोय यात्रेच्या ठिकाणी करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले, अशी माहिती उपायुक्त विद्या पोळ यांनी पत्रकारांना दिली. महापालिकेच्या या प्रशासकिय बैठकीनंतर आता लवकरच यात्रा कमिटीसमवेत बैठक घेण्यात येणार आहे.







## पोलीस अधीक्षकांकडून विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची पाहणी

✔ सुराज्य/पंढरपूर



तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचा नव्याने विकास करताना पुरातन वास्तूचे जतन आणि संवर्धन करुन विकास करण्यात येणार आहे. या विकास आराखड्यात भाविकांची व मंदीराची सुरक्षा तसेच आपत्ती व्यवस्थापनतंर्गत गर्दी नियोजन याबाबतची पाहणी जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पाहणी केली.

विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दर्शनासाठी योणाऱ्या भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा मिळाव्यात तसेच वारकऱ्यांच्या सर्व प्रथा, परंपराचे जतन करून नव्याने विकास करण्यात येणार आहे. भाविकांची वाढती संख्या आणि मंदिरातील गर्दी लक्षात घेता. आपत्ती व्यवस्थापनातंर्गत सुरक्षेच्या दृष्टीने नव्याने करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी करुन आवश्यक सूचना जिल्हा पोलीस अधिक्षक सरदेशपांडे यांनी दिल्या. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी पुरातन वास्तूचे जतन आणि संवर्धन करुन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचा नव्याने विकास करण्यात येणाऱ्या कामांची तसेच सुरक्षेबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनेबाबत माहिती दिली. यावेळी संत नामदेव पायरी, श्री विठ्ठल सभा मंडप, दिपमाळ, मंदीरातील दर्शन रांग, मुखदर्शन व्यवस्था, बाजीराव पडसाळी आदी ठिकाणची पाहणी जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. सरदेशपांडे यांनी केली. यावेळी त्यांच्या समवेत अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे, अप्पर पोलीस अधिक्षक हिंम्मतराव जाधव, उपविभागीय अधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, मुख्याधिकारी अरविंद माळी, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाढ, वास्तुविशारद तेजस्वीनी आफळे, मंदीर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर आदी उपस्थित होते.